सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २७ मे २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ४३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ८९ हजार कोटींच्या ५ प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन

## २० हजार रोजगार निर्माण होणार; मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंजुरी

तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्यात औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सुमारे ८९ हजार ७३१ कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला.



या प्रकल्पांमुळे राज्यात अंदाजे २० हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असून विदर्भ, मराठवाडा, नाशिकसह राज्यातील विविध भागांमध्ये औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी सांगितले. राज्याच्या औद्योगिक धोरणानुसार सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत उद्योगांना विविध सवलती व प्रोत्साहने देण्यात येतात. त्याअंतर्गत नवीन उद्योग स्थापन होऊन मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित व्हावी, रोजगार वाढावा आणि औद्योगिक परिसंस्था निर्माण व्हावी, यासाठी विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष सवलती देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. या उपसमितीची बैठक मंत्रालयात पार पडली.

या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासु यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत कोल गॅसिफिकेशन ॲण्ड डाऊनस्ट्रीम डेरीव्हेटिव्हज, सोलर सेल मॉड्युल, इन्गॉट, वेफर्स पॅनेल, इलेक्ट्रिक स्टील, पेट टायर कॉर्ड तसेच सिंथेटिक ग्रॅफाइट ॲनोड मटेरियल यांसारख्या उच्च तंत्रज्ञानाधारित आणि भविष्यकालीन उद्योग क्षेत्रांतील पाच प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली.

या सर्व प्रकल्पांमुळे राज्यात उच्च तंत्रज्ञानाधारित उत्पादन क्षेत्राचा विस्तार होण्यास मदत होणार आहे. या विशाल प्रकल्पांमुळे गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीसह स्थानिक स्तरावर व्यावसायिक उपक्रम, पूरक उद्योग आणि पुरवठा साखळीही विकसित होणार आहे. तांत्रिक नवकल्पना, संशोधन व विकासाला चालना मिळून लघु व मध्यम उद्योगांना नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच स्थानिक युवकांसाठी प्रशिक्षण व कौशल्य विकासाच्या संधी निर्माण होऊन उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील रोजगारक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.

## 'चंद्रपूर-गडचिरोलीतील २३ नगरसेवक नॉट रीचेबल,

नागपूर : महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर पूर्व विदर्भातील राजकारण चांगलेच तापले आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी थेट घोडेबाजाराचे गंभीर आरोप करत मोठा राजकीय गौप्यस्फोट केला आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील काँग्रेसचे जवळपास २३ नगरसेवक संपर्काबाहेर असल्याचा दावा करत त्यांना पैशांच्या जोरावर फोडण्यात आल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. आमचे चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्याचे जवळपास २३ नगरसेवक नॉट रीचेबल आहेत, आणि मी १०० टक्के सांगतो की, पाच-पाच लाख रुपये देऊन त्यांना उचलले आहे. आमची ती सगळी लोकं पैशाने विकली गेलेली आहेत. आता व्हीप जारी करून त्यांच्या घराला व्हीप चिपकवणार आहोत, आणि त्या नगरसेवकांना अपात्र करण्याची कारवाई आम्ही सुरू करू, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले.

## विधानपरिषदेच्या १२ जागांसाठी भाजपकडून ४८ नावांची यादी तयार

तभा वृत्तसेवा

मुंबई : विधानपरिषदेच्या १६ जागा आणि एका पोटनिवडणुकीसाठी जाहीर झालेल्या रणसंग्रामाच्या पार्श्र्वभूमीवर भाजपमध्ये उमेदवारी निश्र्चितीच्या हालचालींना वेग आला आहे. महायुतीमधील जागावाटपाचा अंतिम निर्णय प्रलंबित असतानाच, भाजपने आपल्या कोट्यातील संभावित १२ जागांसाठी तब्बल ४८ इच्छुकांच्या नावांची यादी तयार केली आहे. ही यादी घेऊन भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे दिल्लीला रवाना होणार आहेत. दिल्ली दौऱ्यात ते भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन उमेदवारांच्या नावांवर सविस्तर चर्चा करणार आहेत.

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी १ जूनपर्यंतची मुदत शिल्लक असल्याने पुढील २ ते ३ दिवसांत भाजपच्या १२ उमेदवारांची नावे निश्र्चित केली जातील. चव्हाणांच्या या दौऱ्यात महायुतीमधील जागावाटपाचा फॉर्म्युला आणि इतर तांत्रिक बाबींचा सविस्तर तपशीलही केंद्रीय नेतृत्वासमोर मांडला जाणार आहे. महायुतीमध्ये भाजपने स्वतःकडे १२ जागा ठेवून शिवसेनेला ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) १ जागा देण्याचा फॉर्म्युला मांडला आहे. मात्र, शिवसेनेने हा प्रस्ताव थेट फेटाळून लावला असून आपण किमान ७ जागा लढवणार असल्याचा पवित्रा घेतला आहे. शिवसेनेने प्रामुख्याने ठाणे, पालघर, नाशिक, कोकण, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ आणि हिंगोली या मतदारसंघांवर दावा ठोकला आहे. भाजप केवळ ४ जागांवरच अडकून राहिल्याने शिवसेनेच्या काही स्थानिक नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी 'स्वबळा'वर लढण्याचा आग्रह नेतृत्वाकडे धरला आहे. तथापि, महायुतीला तडे जाऊ नयेत म्हणून सर्वोच्च पातळीवर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## आठव्या वेतन आयोगाबद्दल उत्साह

नवी दिल्ली : आठव्या वेतन आयोगाबाबत केंद्रीय कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. आठव्या वेतन आयोगाने कर्मचाऱ्यांना मोठा फायदा मिळू शकणार आहे. दरम्यान, आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी कर्मचारी संघटनांनी सरकारसमोर अनेक महत्त्वपूर्ण मागण्या ठेवल्या आहेत. या मागण्या पूर्ण करणे सरकारसाठी डोकेदुखी ठरू शकते. एका वरिष्ठ युनियन प्रतिनिधीच्या मते, सरकारला या सर्व मागण्या पूर्णपणे मान्य करणे सोपे जाणार नाही. सरकारला कर्मचारी कल्याण आणि देशाचा अर्थसंकल्प, आर्थिक दबाव आणि दीर्घकालीन दायित्वे यांच्यात संतुलन साधावे लागेल. सर्वात प्रमुख मागण्यांपैकी एक म्हणजे ३.८३ फिटमेंट फॅक्टरला मंजुरी देणे. फिटमेंट फॅक्टर हे एक सूत्र आहे, जे कर्मचाऱ्याचा मूळ पगार आणि निवृत्तीवेतन निश्र्चित करते. फिटमेंट फॅक्टर जितका जास्त असतो, तितकी पगार आणि भत्त्यांमध्ये जास्त वाढ होते. युनियनचा युक्तिवाद आहे की, वाढत्या महागाईमुळे पगाराचे वास्तविक मूल्य कमी झाले आहे, त्यामुळे ही वाढ आवश्यक आहे.

# सावरकरांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त 'त्रिवेणी' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

मुंबई : शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्यावतीने विद्यमाने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त 'त्रिवेणी' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, ३१ मे २०२६ रोजी रात्री ८ वाजता प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे हा कार्यक्रम होणार आहे.



स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या क्रांतिकारी जीवनकार्याला, राष्ट्रनिष्ठ विचारांना आणि सामाजिक योगदानाला सांस्कृतिक अभिवादन करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. संगीत, नृत्य, नाट्य आणि निवेदन या कलामाध्यमांच्या त्रिवेणी संगमातून सावरकरांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा संघर्षमय जीवनप्रवास आणि राष्ट्रभक्ती प्रभावीपणे उलगडण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने साकारण्यात येणारे विशेष सादरीकरण हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असणार आहे.

प्रा. डॉ. प्रिती पोहेकर यांनी या कार्यक्रमाचे लेखन व निवेदन केले असून, संकल्पना व दिग्दर्शन राजश्री पोहेकर यांचे आहे. कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचा जागर करताना नव्या पिढीपर्यंत राष्ट्रप्रेम आणि सांस्कृतिक मूल्ये पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि सांस्कृतिक कार्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# मोदी खरे धुरंदर, त्यांच्यावर टीका करणारे दलिंदर : एकनाथ शिंदे

तभा वृत्तसेवा

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या बारा वर्षांत देशाचे यशस्वीपणे नेतृत्व करत भारताला विकास, आत्मनिर्भरता आणि जागतिक प्रतिष्ठेच्या नव्या उंचीवर नेले आहे. त्यामुळे मोदी हे खरे धुरंदर असून त्यांच्यावर टीका करणारेच खऱ्या अर्थाने दलिंदर आहेत, अशी खरबरीत आणि आक्रमक टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ आणि विरोधकांवर केली.



मुंबई येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी मोदींवरील टीकेचा तीव्र शब्दांत समाचार घेतला. शिंदे म्हणाले,देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे नरेंद्र मोदी हे आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेत्यांपैकी एक आहेत.

गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून १३ वर्षे आणि देशाचे पंतप्रधान म्हणून १२ वर्षे त्यांनी जनतेचा विश्र्वास संपादन केला आहे. भारताला महासत्तेकडे नेण्याचे, आत्मनिर्भर भारत उभारण्याचे आणि देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्याचे ऐतिहासिक कार्य मोदीजींनी केले आहे.

विरोधकांवर निशाणा साधताना त्यांनी म्हटले की, ज्यांनी आयुष्यात देशासाठी कोणतेही भरीव योगदान दिले नाही, ते आज मोदीजींवर टीका करत आहेत. 'कहाँ राजा भोज और कहाँ गंगू तेली' अशीच त्यांची अवस्था आहे. मोदीजींवर आरोप करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्याचा प्रकार आहे. अशा टीकांमुळे मोदींची प्रतिमा कमी होणार नाही, उलट विरोधकांची राजकीय दिवाळखोरीच उघड होत आहे.

मोदीजींनी देशाला भ्रष्टाचारमुक्त आणि निर्णयक्षम नेतृत्व दिले. संरक्षण क्षेत्रात भारताला आयातदारातून निर्यातदार बनवले. पायाभूत सुविधा, डिजिटल क्रांती, परराष्ट्र धोरण आणि आर्थिक सुधारणांमुळे भारताची जागतिक पातळीवरील ताकद वाढली आहे. बारा वर्षांच्या कार्यकाळात मोदीजींवर भ्रष्टाचाराचा एकही डाग लावता आलेला नाही. हीच त्यांच्या नेतृत्वाची सर्वात मोठी पावती आहे, असेही शिंदे म्हणाले.

काँग्रेस नेत्यांच्या वक्तव्यांचा समाचार घेताना त्यांनी स्पष्ट केले की, देशाच्या पंतप्रधानांवर खालच्या दर्जाची भाषा वापरणे ही भारतीय संस्कृती नाही. राजकीय विरोध असू शकतो, पण वैयक्तिक पातळीवर घसरून केलेली टीका जनता कधीही सहन करणार नाही. १४० कोटी भारतीय मोदीजींच्या कामगिरीचे साक्षीदार आहेत आणि योग्य वेळी विरोधकांना उत्तर देतील.

## सीएनजीच्या किमतीतही वाढ

मुंबई :पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांनी आधीच सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असताना आता सीएनजीच्या किमतींनीही नागरिकांची चिंता वाढवली आहे. एकेकाळी स्वस्त आणि परवडणारे इंधन मानल्या जाणाऱ्या सीएनजीच्या दरात पुन्हा एकदा वाढ करण्यात आली आहे. मंगळवार, २६ मेपासून नवीन दर लागू झाले असून सीएनजी प्रति किलो तब्बल २ रुपयांनी महागला आहे.

राजधानी दिल्ली मध्ये सीएनजीचा दर ८१.०९ रुपयांवरून थेट ८३.०९ रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचला आहे. तर नोएडा आणि गाझियाबाद येथेही दरवाढ लागू करण्यात आली असून, तेथे सीएनजी ८९.७० रुपयांवरून ९१.७० रुपये प्रति किलो झाला आहे.

## दुकानात शिरला बिबट्या

तभा वृत्तसेवा

अमरावती : अमरावती शहरातील रामपुरी कॅम्पमध्ये बिबट्या शिरल्याची घटना घडली. बिबट्या रामपुरी परिसरात एका दुकानाच्या गाळ्यात शिरला. यावेळी प्रसंगावधान साधत दुकान मालकाने दुकानाचे शटर लावले. यामुळे मोठा अनर्थ टळला. दुकानाचे शटर लावल्यानंतर पोलीस आणि वन विभागाला या घटनेची माहिती देण्यात आली. यानंतर पोलीस आणि वन विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. वन विभागाकडून तातडीने वाघाच्या रेस्क्यू ऑपरेशनला सुरुवात झाली. वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी शटरच्या बाहेर जमिनीपासून ते छतापर्यंत मोठी जाळी लावली आहे. वन विभागाच्या पथकाकडून अथक प्रयत्न केले जात आहेत.

## महिलांच्या खात्यात दरमहा ३ हजार रुपये जमा होणार! पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांची घोषणा

वृत्तसंस्था

कोलकाता : पश्र्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदु अधिकारी यांनी राज्यातील जनतेसाठी महत्त्वपूर्ण लोककल्याणकारी घोषणांचा धडाका लावला आहे. शाळा, महाविद्यालये आणि धार्मिक स्थळांच्या एक किलोमीटर परिसरात दारूची दुकाने सुरू करण्यास सक्त मनाई असेल, असा महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी जाहीर केला आहे. याशिवाय, राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'अन्नपूर्णा योजना' कार्यान्वित करण्यात येत असून, त्याअंतर्गत पात्र महिलांच्या बँक खात्यात दरमहा ३,००० रुपयांची थेट मदत जमा केली जाणार आहे.

नादिया जिल्ह्यातील कल्याणी येथे आयोजित एका प्रशासकीय बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री अधिकारी यांनी या योजनेची अधिकृत घोषणा केली. त्यांनी सांगितले की, २७ मे पासून राज्य सचिवालयामार्फत अन्नपूर्णा योजनेसाठीचे अर्ज उपलब्ध करून दिले जातील. या योजनेचा लाभ घेण्यास सर्व भारतीय नागरिक पात्र असतील आणि अर्ज प्रक्रिया पूर्ण होताच संबंधित महिलांच्या खात्यात ३,००० रुपयांची रक्कम हस्तांतरित करण्यास सुरुवात होईल. अन्नसुरक्षेच्या दिशेने आणखी एक पाऊल उचलत, राज्य सरकारने राज्यातील सुमारे ४०० विशेष कॅन्टीन्समध्ये आठवड्यातून दोनदा अवघ्या ५ रुपयांत 'मासे आणि भात' असा पौष्टिक आहार उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, आरोग्य विभागाच्या धर्तीवर राज्यात स्वतंत्र 'आयुष विभाग' स्थापन करण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली आहे. दुसरीकडे, प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि थेट जनसंवाद साधण्यासाठी मुख्यमंत्री शुभेंदु अधिकारी यांनी 'जनता दरबार' उपक्रम सुरू केला आहे.




# सामूहिक विवाहाच्या नावाखाली मध्य प्रदेशात लाखोंचा गंडा!

वृत्तसंस्था

देवास :अंगावर भरजरी शेरवानी, गळ्यात सुवासिक झेंडूच्या फुलांचे हार, हातात आनंदाने आणलेले मिठाईचे डब्बे आणि डोळ्यांत सुखी संसाराची स्वप्ने... अशा मोठ्या उत्साहात तब्बल ४२ नवरदेव आपल्या कुटुंबियांसह विवाहस्थळी दाखल झाले होते. मात्र, ज्या क्षणाची ते आतुरतेने वाट पाहत होते, तो क्षण आलाच नाही. काही वेळातच त्यांच्यासमोर एक अशी धक्कादायक हकीकत आली, ज्याने उपस्थित सर्वांनाच सुन्न केले. लग्नमंडपात एकही नवरी आलीच नव्हती! अनाथाश्रमातील मुलींशी लग्न लावून देण्याच्या बहाण्याने एका टोळीने या सर्व तरुणांची सामूहिक विवाहाच्या नावाखाली फसवणूक केल्याचा संतापजनक प्रकार मध्य प्रदेशातील देवासमध्ये उघडकीस आला आहे.पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, हे प्रकरण केवळ आर्थिक लुटीपुरते मर्यादित नसून, ग्रामीण भागातील साध्या-भोळ्या तरुणांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या भावनांशी खेळणारा एक मोठा मानसिक छळ आहे. आरोपींनी विश्र्वास संपादन करण्यासाठी इंदूरमधील एका नामांकित 'मातृ छाया आश्रमा'च्या नावाचा गैरवापर केला होता. रविवारी दुपारपर्यंत ज्या विवाहस्थळी सनई-चौघड्यांचे सूर आणि आनंदाचे वातावरण असायला हवे होते, तिथे संध्याकाळपर्यंत फसवणूक झाल्याचे समजताच तीव्र संताप, अश्रू आणि निराशेचे सावट पसरले होते.



या रॅकेटने तरुणांना जाळ्यात ओढण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि खोट्या कथांचा आधार घेतला होता. लग्न ठरवण्यापूर्वी मध्यस्थांनी प्रत्येक नवरदेवाच्या मोबाईलवर मुलींचे फोटो पाठवले होते. या मुली अतिशय गरीब असून अनाथाश्रमात वाढल्या आहेत, त्यामुळे त्या कोणत्याही अटीशिवाय लगेच लग्नास तयार आहेत, असे सांगून तरुणांचा विश्र्वास जिंकला. यासाठी प्रत्येकाकडून 'नोंदणी शुल्क' म्हणून दिड हजार ते २५ हजार रुपये उकळण्यात आले. पीडित नवरदेव अशोकने दिलेल्या माहितीनुसार, आयोजकांनीसर्वचवऱ्हाडींना एक अजब अट घातली होती. त्यांनी सांगितले होते की, कोणीही घरून हळद किंवा मेहंदीचे विधी करून यायचे नाही. लग्न कपडे आणि विवाहाचे सर्व विधी थेट विवाहस्थळीच केले जातील. यामुळे तरुणांनी घरगुती पातळीवर कोणतेही मोठे आयोजन केले नाही आणि टोळीचे बिंग फुटायला उशीर झाला.

## देवस्थान समितीमधील भ्रष्टाचार समोर

कोल्हापूर : पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीमध्ये कोट्यावधींचा घोटाळा झाल्याचं एक प्रकरण समोर आलं आहे. क्षत्रिय मराठा रियासत फाउंडेशन कडून २०१७ ते २०२१ या कालावधी दरम्यान तत्कालीन देवस्थानच्या समितीने गैरव्यवहार केला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. २०२१ पासून या संस्थेचे काही पदाधिकारी हा गैरव्यवहार उघडकीस यावा यासाठी पाठपुरावा करत आहेत. सध्या या संस्थेला विधी व न्याय विभागाकडून तत्कालीन समितीच्या गैरव्यवहाराबाबत चौकशी होणार असल्याचं पत्राद्वारे उत्तर मिळाला आहे. भूमिका आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बाजाराच्या कामासाठी आलेल्या 33 वर्षीय इसमाचा हृदयविकाराने दुर्दैवी मृत्यू



तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.२६ मे - कुटुंबासाठी कामधंद्याच्या धावपळीत बाजाराच्या दिवशी कन्नड शहरात आलेल्या एका तरुणावर काळाने अचानक झडप घातल्याने मेहुण गावावर शोककळा पसरली आहे. राजेश राठोड (वय ३३, रा. मेहुण ता. कन्नड) यांचे सोमवारी दि. २५ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, राजेश राठोड हे आधार कार्ड दुरुस्तीच्या कामासाठी कन्नड शहरात आले होते. काम आटोपल्यानंतर ते आपल्या मेहुण गावाकडे परत निघाले होते. दरम्यान, गौताळा अभयारण्यातील नागद चौफुली परिसरात त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांनी रस्त्याकडेला थांबून थोडा आराम केला. मात्र काही वेळातच त्यांचा त्रास अधिक वाढला. यावेळी पाठीमागून आलेल्या त्यांच्या काकांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांना तत्काळ कन्नड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. परंतु डॉक्टरांनी तपासणी केली असता त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याचे स्पष्ट झाले आणि उपचारादरम्यान सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली.

अचानक घडलेल्या या घटनेमुळे मेहुण गावात हळहळ व्यक्त होत असून संपूर्ण परिसर शोकमग्न झाला आहे. अत्यंत शांत व मनमिळावू स्वभावामुळे राजेश राठोड यांची गावात ओळख होती. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, आई-वडील असा परिवार आहे. तरुण वयातच कुटुंबाचा आधार हरपल्याने परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## ‘राजा शिवाजी’ 100 कोटी रुपयांचा गल्ला पार करणारा ठरला पहिला मराठी चित्रपट




छत्रपती संभाजीनगर - जिओ स्टुडिओज आणि मुंबई फिल्म कंपनी निर्मित, रितेश विलासराव देशमुख दिग्दर्शित ‘राजा शिवाजी’ या चित्रपटाने आपली ऐतिहासिक यशस्वी घोडदौड सुरू ठेवत, भारतात १०० कोटी रुपयांचा निव्वळ गल्ला पार करणारा पहिला मराठी चित्रपट म्हणून आणखी एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. भारतात १०१.४० कोटी रुपयांची उत्कृष्ट निव्वळ कमाई करून, या चित्रपटाने आपला ब्लॉकबस्टर दर्जा अधिकच मजबूत केला आहे.

मराठी चित्रपटासाठी आतापर्यंतचा *सर्वात मोठा ओपनिंग डे*, *सर्वात मोठा ओपनिंग वीकेंड* आणि *सर्वाधिक एका दिवसातील कलेक्शनसह* विक्रमांची नोंद केल्यानंतर, या भव्य चित्रपटाने तिसऱ्या आठवड्यात आणि चौथ्या वीकेंडमध्येही आपली यशस्वी घोडदौड सुरू ठेवली आहे. बॉक्स ऑफिस ब्रेक-अप भारत निव्वळ, पहिला आठवडा ५७.७० कोटी, दुसरा आठवडा २७.०० कोटी तिसरा वीकेंड ८.४० कोटी, तिसरा आठवडा चौथा वीकेंड, १८ वा दिवस सोमवार१.२५ कोटी, १९ वा दिवस मंगळवार १.४५ कोटी.

## डॉ. सुजाता गायकवाड (वाघ) यांना पीएच.डी. प्रदान



छत्रपती संभाजीनगर, तभा वृत्तसेवा प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांनी सौ. सुजाता प्रकाश गायकवाड (वाघ) यांना बायोटेक्नॉलॉजी विषयातील पीएच. डी. पदवी प्रदान केली आहे.

त्यांनी “एपिजेनेटिक रेग्युलेशन इन रिकरन्सेस ऑफ सर्व्हायकल कॅन्सर” या विषयावर संशोधन पूर्ण केले. हा संशोधन प्रबंध प्रा. डॉ. गुलाब डी. खेडकर, संशोधन मार्गदर्शक तथा प्राणीशास्त्र विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करण्यात आला होता. विद्यापीठाने या संशोधनास मान्यता दिल्यानंतर त्यांना पीएच.डी. पदवी बहाल करण्यात आली. डॉ. सुजाता गायकवाड यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## सिंगल-लोकेशन बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम सुरू केली

छत्रपती संभाजीनगर : भारतातील सर्वात मोठी नवीकरणीय ऊर्जा कंपनी असलेल्या अदाणी ग्रीन एनर्जी लिमिटेड'ने (एजीईएल) एकूण 3.37 गिगावॅट-तास (GWh) क्षमतेची बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम (BESS) सुरू केली आहे. चीनबाहेर एकाच ठिकाणी उभारण्यात आलेली ही जगातील सर्वात मोठी बॅटरी स्टोरेज सुविधा असून, जगातील सर्वात वेगाने पूर्ण करण्यात आलेल्या प्रकल्पांपैकी एक आहे. या प्रकल्पात मार्च 2026 मध्ये सुरू करण्यात आलेल्या 1.37 गिगावॅट-तास क्षमतेचा देखील समावेश आहे. यामुळे गुजरातच्या खावडा येथील एजीईएलची एकूण कार्यरत बॅटरी स्टोरेज क्षमता 3.37 गिगावॅट-तास झाली आहे. हा प्रकल्प साइटवर काम सुरू झाल्यानंतर फक्त 10 महिन्यांत पूर्ण करण्यात आला, त्यामुळे हा जगातील सर्वात वेगाने उभारण्यात आलेल्या युटिलिटी-स्केल बॅटरी स्टोरेज प्रकल्पांपैकी एक ठरला आहे.

## मॅरिकोने हेअर क्लीन्सिंग सेगमेंटमध्ये प्रवेश केला

मुंबई - भारतातील आघाडीच्या एफएमसीजी कंपन्यांपैकी एक असलेल्या, मॅरिको लिमिटेड ने आज पॅराशूट अॅडव्हान्स्ड प्रोटीन शॅम्पूच्या लाँचसह हेअर क्लिन्झिंग श्रेणीमध्ये प्रवेश करून, हेअरकेअर क्षेत्रामधील आपले स्थान अधिक बळकट केले आहे. नारळ आणि नैसर्गिक घटकांच्या गुणधर्मांनी समृद्ध असलेली ही नवीन प्रोटीन शॅम्पू श्रेणी, हेअरकेअर क्षेत्रात या ब्रँडचे स्थान अधिकच बळकट करेल. शिष गोपाल, सीईओ - इंडिया कोअर बिझनेस, मॅरिको लिमिटेड म्हणाले, “पॅराशूट अॅडव्हान्स्ड कोकोनटच्या गुणधर्मांसह हेअर-क्लिंझिंग स्वरूपातील हे उत्पादन सादर करणे, हे गेल्या काही वर्षांत मॅरिकोने आपल्या श्रेणीत केलेला एक महत्त्वपूर्ण विस्तार दर्शवते. नैसर्गिक उत्पादनांसाठी ग्राहकांची वाढती मागणी पूर्ण करण्याच्या उद्देशाने पॅराशूट अॅडव्हान्स्ड शॅम्पू हे एक धोरणात्मक पाऊल आहे. यावरून उद्देशपूर्ण आणि नारळावर आधारित नावीन्यपूर्ण उत्पादने सादर करण्याबाबतची मॅरिकोची कटिबद्धता दिसून येते.

## “टीकेएम बिझइंटेल हब” साठी-सामंजस्य करार

बंगळुरू-: टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज कर्नाटक सरकारसोबत सामंजस्य करार (एमओयू) केल्याची घोषणा केली. या कराराअंतर्गत कंपनी बंगळुरूमधील क्विन सिटी येथे “टीकेएम बिझइंटेल हब” स्थापन करून भारतातील आपले कार्यक्षेत्र विस्तारण्याच्या दिशेने पाऊल टाकणार आहे. हा उपक्रम अभियांत्रिकी क्षमता आणि डिजिटल नवोपक्रम अधिक मजबूत करण्यासाठी असलेल्या सहकार्याचे आणि सामायिक वचनबद्धतेचे प्रतीक आहे.हा सामंजस्य करार कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, मोठे आणि मध्यम उद्योग मंत्री डॉ. एम. बी. पाटील तसेच टोयोटा किर्लोस्कर मोटरचे वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

## ‘दि केरला स्टोरी 2’ चा वर्ल्ड टीव्ही प्रीमियर

छत्रपती संभाजीनगर : आता ही कथा फक्त सांगितली जाणार नाही... तर ती अनुभवलीही जाणार आहे.” देशभर चर्चेत राहिलेला आणि आपल्या प्रभावी कथनशैलीने प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा ‘दि केरला स्टोरी 2’ आता झी सिनेमावर आपल्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरसाठी सज्ज आहे. सत्य घटनांवर आधारित हा चित्रपट समाजातील एका संवेदनशील विषयावर ठाम आणि प्रभावी दृष्टिकोन मांडतो. ही रोमहर्षक आणि विचार करायला लावणारी कथा पहा ह्या गुरुवारी, 28 मे रोजी रात्री 8 वाजता फक्त झी सिनेमा वर.

# बकरी ईद शांततेत साजरी करा; कायद्याचे काटेकोर पालन करा : पोलीस आयुक्त प्रविण पवार यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर : बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले असून, पोलीस आयुक्त कार्यालयातील सभागृहात महत्त्वपूर्ण शांतता समिती बैठक पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी पोलीस आयुक्त प्रविण पवार होते.

या बैठकीस शहरातील प्रमुख मुस्लिम धर्मगुरू, मस्जिदींचे इमाम, ईदगाहचे मौलाना, शांतता समिती सदस्य, लोकप्रतिनिधी तसेच विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस आयुक्तांनी दि. २८ मे रोजी साजऱ्या होणाऱ्या बकरी ईद निमित्त महाराष्ट्र प्राणी संवर्धन (सुधारित) कायदा १९९५ चे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले.

कुर्बानी केवळ महानगरपालिकेने निश्चित केलेल्या अधिकृत कत्तलखान्यांमध्येच करावी, उघड्यावर मांसाची वाहतूक करू नये तसेच शासनाने मान्यता दिलेल्या जनावरांचीच कुर्बानी द्यावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. बंदी असलेल्या जनावरांची कुर्बानी आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलीस प्रशासनाने दिला.

शहरातील सामाजिक सलोखा आणि शांतता अबाधित राखण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, अफवा किंवा सोशल



मीडियावरून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या घटकांची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले. कोणत्याही अनुचित प्रकाराची माहिती स्थानिक पोलीस ठाणे किंवा नियंत्रण कक्षाच्या टोल फ्री क्रमांक ११२ वर देण्याचेही सांगण्यात आले.

बैठकीत शहरातील वाहतूक, सुरक्षा आणि कायदा सुव्यवस्था संदर्भातील उपाययोजनांची माहिती देण्यात आली. शहरात ६ चेकपोस्ट उभारण्यात आल्या असून, तेथे २४ तास पोलीस, वाहतूक विभाग आणि पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी तैनात राहणार आहेत. तसेच गुन्हे शाखा व परिमंडळ स्तरावर विशेष पथकेही कार्यरत करण्यात आली आहेत.

बकरी ईद निमित्त शहरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून, त्यामध्ये ४ पोलीस उपायुक्त, ७ सहाय्यक पोलीस आयुक्त, २५ पोलीस निरीक्षक, ५८ सहाय्यक पोलीस निरीक्षक/उपनिरीक्षक, ९८६ पोलीस कर्मचारी, ४९ महिला पोलीस कर्मचारी, ७ कॅमेरामन, १ एसआरपीएफ कंपनी तसेच ४०० पुरुष व १०० महिला होमगार्डचा समावेश असणार आहे. गर्दीच्या ठिकाणी गणवेशातील तसेच साध्या वेशातील पोलिसांकडून विशेष गस्त घालण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

या बैठकीस पोलीस उप आयुक्त गुन्हे प्रशांत मोहिते, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ पंकज अतुलकर, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२ रत्नाकर नवले यांच्यासह सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त आणि पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

तसेच मौलाना अब्दुल रशीद मदनी, मौलाना इकबाल अन्सारी, विविध ईदगाह कमिटीचे पदाधिकारी, महानगरपालिका विरोधी पक्षनेते समीर साजीद विल्डर, नगरसेवक जावेद कुरेशी, ईसा कुरेशी, कुरेशी जमात अध्यक्ष, डॉ. मुर्तुजा, गजानन बारवाल, रशीद खान मामू, एजाज झैदी यांच्यासह २०० ते २५० पदाधिकारी व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# घरकुल मोफत वाळू डेपोवर सावळा गोंधळ ?

तभा वृत्तसेवा

पैठण दि २६ :- पैठण तालुक्यातील घरकुल धारकांना मोफत पाच ब्रास वाळू देण्यात येणाऱ्या चनकवाडी निम्न बंधारा वाळू डेपोवर स्थानिक चनकवाडी व तेलवाडीच्या गावकऱ्यांनी विरोध दर्शवला असून शेकडो महिला पुरुष अबाल वृद्ध नागरिकांनी चक्का जाम आंदोलन करत प्राधान्य देण्याची मागणी केली. यावेळी उप जिल्हा प्रमुख विनोद पाटील बोंबले, पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी मध्यस्थी करून मार्ग मोकळा केला.

चनकवाडी निम्न बंधारा घरकुल मोफत वाळू डेपोला मोठया प्रमाणात विरोध होत असून याठिकाणी 'भर अब्दुला गुड थैली मे ' अशी गत झाली आहे.



स्थानिक गांवकऱ्यानी सावळा गोंधळ सुरु असल्याचे आरोप करत आधी तेलवाडी, चनकवाडी गावांतील घरकुल धारकांना प्राध्यान देत वाळू टाकण्याची मागणी केली.यावर गावांतील शेकडो महिला पुरुषांनी अबाल वृद्धासह चक्का जाम आंदोलन केले असता आंदोलनस्थळी भेट देऊन गावांतील नागरिकांना प्रथम प्राध्यान दिले जाणार असल्याची माहिती शिवसेना उप जिल्हा प्रमुख विनोद पाटील बोंबले यांनी दिली.

चनकवाडी निम्न बंधारा घरकुल मोफत वाळू डेपोवर सावळा गोंधळ चालत असल्याचा आरोप केला जात आहे. याठिकाणी वाळू वाहतूक करणारे हयावा ट्रक वाहन याची माहिती प्रशासनाकडे नाही. वाहतूक करणारा गाडी चालक वाळूची एक ट्रिप घरकुलाला तर एक ट्रिप काळ्या बाजारात विकत आहे. वाळू डेपोवर कोठेही सिसिटीव्ही कॅमेरे नसल्याने याठिकाणी प्रशासनासमोर खासगी ट्रक,ट्रॅक्टर चोरून वाळू घेऊन पसार होत आहे . चांगली गुणवत्ता असलेला वाळूचा साठा असल्याने याठिकाणी वाळू तस्करांचा गरडा वाढला असल्याची तक्रार करण्यात आली असून प्रत्येक घरकुल धारकांना मोफत वाळू देण्याचा आमचा मानस असल्याची माहिती स्थानिक प्रशासनाने दिली आहे.

# सोयगाव शहरासह परिसरात पिसाळलेल्या श्वानांचा धुमाकूळ;- आठ जणांचे तोडले लचके

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२६ मे : शहरात अचानक सोमवारी सकाळी दहा वाजेपासून पिसाळलेल्या श्वानांचा धुमाकूळ घालून एक ते दीड तासात तब्बल सात ते आठ जणांचे लचके तोडून गंभीर जखमी झाल्या ची घटना शहरातील गजानन महाराज मंदिर परिसरात सोमवारी अकरा वाजेच्या सुमारास घडली दरम्यान या घटनेत अंगणात खेळत असलेल्या अथर्व पंकज परदेशी (वय साडे तीन वर्षे) शिवाजीनगर आमखेडा परिसरात अंगणात खेळणाऱ्या या बालकांवर पिसाळलेल्या कुत्र्यांनी लचके तोडून जखमी केले आहे.दरम्यान तातडीने त्यास जळगाव येथील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल केले आहे.दरम्यान या घटनेनंतर पुन्हा सात ते आठ जणांना या कुत्र्यांनी गंभीर जखमी केले आहे. या घटनेमुळे शहर व परिसरात नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे यावर तातडीने उपाय योजना करण्याची मागणी केली आहे.

**हे आहेत जखमी** | १) हर्षल परदेशी (साडेतीन वर्ष)२)हर्षवर्धन वाघ (आठ वर्ष),३)साई आगे (बारा वर्ष)४) राजेंद्र बोडखे (चाळीस वर्षे) ५)ममता ठाकरे (सहा वर्ष),६) ऋतिका मोरे (तेरा वर्ष)७) उमेश सुरे (एकोणावीस वर्षे) ८)उमेश शेख (पंधरा वर्षे)९)तेजस काळे (चोवीस वर्ष)



### सोयगावात रेबीज चा तुटवडा

सोयगाव सह तालुक्यात डॉग बाईट चे रेबीज इंजेक्शन मिळत नसल्याने रुग्णांना जळगाव जावे लागत आहे सोयगाव तालुका आरोग्य विभागात रेबीजचा तुटवडा निर्माण झालेला आहे त्यामुळे रुग्णांची हेळसांड होत आहे.

# महानगरपालिका मुख्यालय परिसर स्वच्छ व सुस्थितीत ठेवण्याचे आयुक्त अमोल येडगे यांचे निर्देश

## रिकाम्या जागांचा नियोजनबद्ध वापर करून दुचाकी पार्किंगची सुविधा उभारण्याच्या सूचना

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे यांनी महानगरपालिका मुख्यालय परिसराची पाहणी करून मुख्यालय व परिसर स्वच्छ, नीटनेटका आणि शिस्तबद्ध ठेवण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच मुख्यालय परिसरातील रिकाम्या जागांचा नियोजनबद्ध व उपयुक्त वापर करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

आयुक्त अमोल येडगे यांनी मुख्यालय परिसर, साईड मार्जिन तसेच अंतर्गत मार्गांची पाहणी केली. यावेळी परिसरात मोठ्या



प्रमाणात भंगार साहित्य, विटांचे तुकडे, फरशी तसेच वापरात नसलेल्या विविध वस्तू पडून असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. संबंधित विभागांना हे साहित्य तातडीने हटवून परिसर स्वच्छ करण्याचे आदेश त्यांनी दिले. उपलब्ध जागेचा प्रभावी वापर करण्यासाठी आवश्यकतेनुसार शेड उभारून दुचाकी वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था निर्माण करण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या. महानगरपालिका मुख्यालय परिसर नागरिक व कर्मचारी यांच्या दृष्टीने अधिक सुविधायुक्त आणि व्यवस्थित राहावा, यासाठी प्रशासनाने सातत्याने प्रयत्नशील राहावे, असेही त्यांनी नमूद केले. याशिवाय आयुक्तांनी मुख्यालयातील लेखा विभाग तसेच उपायुक्त-१ कार्यालयाची पाहणी करून कार्यालयीन कामकाजाचा आढावा घेतला. विविध विभागांतील कामकाज अधिक कार्यक्षम, सुव्यवस्थित आणि वेळेत पूर्ण होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

या पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उप आयुक्त अपर्णा थेटे, शहर अभियंता संजय कोंबडे तसेच सहाय्यक आयुक्त लता पुजारी आदी उपस्थित होते.

# भरधाव कारची दुचाकीला धडक; शिरोडी येथील शेतकरी गंभीर जखमी

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.२६ मे - धुळे–संभाजीनगर बायपासवरील नवीन उड्डाण पुलाजवळ भरधाव मेंदी रंगाच्या चारचाकी कारने दुचाकीला धडक दिल्याने शिरोडी येथील शेतकरी गंभीर जखमी झाल्याची घटना दि.२२ मे रोजी घडली. अपघातानंतर कार चालक घटनास्थळावरून फरार झाला. याबाबत पोपट आसाराम इंगळे (वय ५२, व्यवसाय शेती, रा. शिरोडी पो. औराळा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर) यांनी दिलेल्या जबाबानुसार, ते व त्यांचे मित्र दिलीप शिवाजी बोरसे हे दोघे दुचाकीने एका कार्यक्रमासाठी कन्नडकडे निघाले होते. सकाळी सुमारे ११.४५ वाजेच्या दरम्यान धुळे–संभाजीनगर बायपासने कन्नडकडे जाणाऱ्या नवीन उड्डाण पुलाजवळील वळणावर एक भरधाव मेंदी रंगाच्या चारचाकी कारने डाव्या बाजूने ओव्हरटेक करत त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात पोपट इंगळे यांच्या उजव्या बाजूच्या बरगडीला फ्रॅक्चर झाले असून डोक्याला, चेहऱ्याला व हाताला दुखापत झाली आहे. तर त्यांचे मित्र दिलीप बोरसे यांच्या गुडघ्याला व हाताला मार लागला आहे. अपघातानंतर रस्त्याने जाणारे त्यांचे परिचयाचे प्रदीप नलावडे (रा. कानडगाव) यांनी दोघांनाही आपल्या वाहनातून कन्नड येथील छलानी दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले. मात्र तेथे डॉक्टर उपलब्ध नसल्याने पुढील उपचारासाठी त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील हेडगेवार रुग्णालयात हलविण्यात आले असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, अपघात घडवून आणणारा कार चालक अपघातानंतर न थांबता पसार झाला असून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून पोलिस अधिक तपास करत आहे.

# देवस्थान भूमी संरक्षण परिषद मुंबई येथे संपन्न!

## वक्फला वगळून केवळ हिंदूंच्या मंदिरांच्या इनाम जमिनींचे अधिग्रहण का? : मंदिर विश्वस्तांचा संतप्त सवाल

मुंबई : मुसलमानांच्या वक्फ बोर्डाला या कायद्यातून पूर्णपणे सूट द्यायची आणि केवळ हिंदूंच्या देवस्थानांची तब्बल साडेचार लाख हेक्टर इनाम भूमी ताब्यात घ्यायची, हे सरकारचे धोरण म्हणजे हिंदूंच्या धार्मिक मालमत्तेवरील एकतर्फी घाला आहे. वक्फला वगळून केवळ हिंदूंच्या मंदिरांच्या जमिनींचेच अधिग्रहण का?" असा संतप्त सवाल करत राज्यभरातील मंदिर विश्वस्तांनी सरकारला धारेवर धरले. महाराष्ट्र सरकारच्या वतीने प्रस्तावित असलेल्या ‘महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम 2026’ मसुद्याला तीव्र विरोध करण्यासाठी मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकात 'देवस्थान भूमी राज्यस्तरीय संरक्षण परिषद' 25 मे या दिवशी पार पडली. या परिषदेत हिंदूंच्या मंदिरांच्या बहुमोल जागा हिरावून घेणारा हा प्रस्तावित कायदा सरकारने विनाअट आणि तातडीने मागे घ्यावा, असा जाहीर ठराव उपस्थित मंदिर विश्वस्त, कायदेतज्ज्ञ आणि हिंदू संघटनांच्या वतीने एकमुखाने संमत करण्यात आला.

या वेळी ठरावाच्या




माध्यमांतून सरकारने मंदिरांच्या जमिनींवर डोळा ठेवण्याऐवजी राज्यातील देवस्थानांच्या मूळ आणि गंभीर समस्या सोडवण्यासाठी प्रामाणिक पुढाकार घ्यावा, अशी आग्रही मागणी परिषदेत लावून धरण्यात आली. आज राज्यातील हजारो ग्रामीण आणि ऐतिहासिक मंदिरांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. अनेक मंदिरांचे पुजारी तुटपुंज्या उत्पन्नावर किंवा केवळ श्रद्धेपोटी देवाचे नित्य सोपस्कार पार पाडत आहेत, त्यामुळे अशा पुजाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न सरकारने गांभीर्याने सोडवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, राज्यातील प्राचीन व जीर्ण झालेल्या मंदिरांचे पुनरुज्जीवन करणे, त्यांच्या जीर्णोद्धारासाठी विशेष निधी देणे आणि आर्थिकदृष्ट्या कमालीच्या कमकुवत असलेल्या मंदिरांना दैनंदिन व्यवस्थापनासाठी सरकारी स्तरावरून ठोस आर्थिक मदत पुरवणे गरजेचे आहे. ही मूळ कर्तव्ये सोडून सरकार साडेचार लाख हेक्टर जमीन बळकावण्याचे उद्योग करत असल्याचा थेट आरोप मंदिर विश्वस्तांनी केला आहे.

या परिषदेत उपस्थित वक्त्यांनी सरकारच्या भूमिकेवर कडाडून टीका केली. जर वक्फ मालमत्तांच्या संरक्षणासाठी वक्फ बोर्ड कार्यरत असू शकते, तर मग हिंदूंच्या मंदिरांच्या रक्षणासाठी 'सनातन बोर्डा'ची स्थापना का केली जात नाही, असा धारदार प्रश्न महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी उपस्थित केला. मशिदी आणि चर्चमधील धन त्यांच्या धार्मिक कार्यासाठी वापरले जाते, मात्र हिंदूंच्या मंदिरांतील पैशांवर राजकारणी डल्ला मारत असून मंदिरांची पद्धतशीर लूट चालवली आहे, अशी घणाघाती टीका विधीज्ञांनी केली. वक्फ मंडळाच्या भूमीवरील अतिक्रमण सरकारी खर्चाने हटवले जाते, मग हिंदूंच्या मंदिरांच्या बाबतीत हा न्याय का नाकारला जातो, असा सवाल करत वक्फ मालमत्तांप्रमाणेच हिंदू मंदिरांच्या मालमत्तेसाठीही तातडीने ‘इस्टेट ऑफिसर’ नेमण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली. देवस्थानची भूमी ही केवळ आणि केवळ देवाची संपत्ती असून, मंदिरांमध्ये येणाऱ्या अर्पणाचा विनियोग केवळ हिंदू धर्माच्या प्रचार-प्रसारासाठीच झाला पाहिजे, या भूमिकेवर सर्व मंदिर विश्वस्त ठाम राहिले.

या वेळी मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष श्री. रणजित सावरकर, हिंदू विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर, राष्ट्रीय सचिव आणि ज्येष्ठ विधीज्ञ संजीव पुनाळेकर, मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिवक्त्या सिद्धविद्या आणि महड येथील श्री अष्टविनायक क्षेत्र श्री गणपती संस्थानच्या कार्याध्यक्षा अधिवक्त्या (सौ.) मोहिनी वैद्य यांनी संबोधित केले.

# फर्दापूर पाणीपुरवठा योजनेसाठी 50 लाख रुपये शासनाकडून मंजूर

## कायमचा फर्दापूरचा पाणी प्रश्न सुटणार

सोयगाव,दि.२६ मे - सोयगाव तालुक्यातील फर्दापूर पाणीपुरवठा योजना सुरळीत व्हावी म्हणून इद्रिस मुलतानी यांच्या निवेदनानुसार दि.७/४/२०२६ रोजी पाणीपुरवठा राज्य मंत्री मेघनाताई बोर्डीकर यांची मुंबई येथे पाणी पुरवठा सचिव व मुख्य अभियंता पाणी पुरवठा व गावकरी यांचा उपस्थित बैठक संपन्न झाली त्या बैठकीस मंत्री महोदयांनी तात्काळ या प्रकरणी चौकशी करून पाणी सुरळीत होण्याच्या दृष्टीने तात्काळ उपाय योजना करता सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार दुसऱ्याच दिवशी पाणीपुरवठा विभागाच्या टीमने भेट देऊन पाहणी केली व दुसऱ्या दिवशी जिल्हा परिषदचे अधिकारी व जिल्हा परिषद अध्यक्ष ने भेट दिली त्यानुसार पाणीपुरवठा विभागाने टंचाईमध्ये ५० लाख रुपये अंदाज पत्रक जिल्हा अधिकारी कार्यालय यांच्याकडे मंजुरीसाठी दाखल केले विभागीय आयुक्त यांना प्रस्ताव शासनास सादर केला पण प्रस्ताव १५ एप्रिल नंतर मंजुरीचे अधिकार शासनास आसल्यामुळे प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले.प्रस्ताव लवकर मंजूर करण्यासाठी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुलतानी, सभापती उत्तम चव्हाण,सोयगाव पंचायत समिती सदस्य राहुल राठोड यांनी पाठपुरावा केला.योजना मंजुरीसाठी दि. १४/५/२०२६ गुरुवार रोजी पुन्हा मेघनाताई बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली योजना मंजुरीसाठी व्हि.सी (VC)द्वारे बैठक संपन्न झाली,त्या बैठकी मध्ये इद्रिस मुलतानी,पाणीपुरवठा प्रधान सचिव,विभागीय आयुक्त संभाजीनगर,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचासह पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. त्या मध्ये फर्दापूरची पाणीपुरवठा योजनेसाठी ५० लाख रुपये विशेष बाब म्हणून मंजूर करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार शासनाने आज मंजुरी दिले,त्यामुळे दुरुस्तीचे काम एक महिन्यात पूर्ण होऊन पाणी सुरळीत होइल.

## संक्षिप्त वृत्त...

### सेलूतील संतप्त नागरिकांचे महावितरण कार्यालयात आंदोलन

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरातील शिक्षण कॉलनी व सर्वोदय नगर परिसरातील नागरिक मागील अनेक दिवसांपासून गंभीर वीज समस्यांना सामोरे जात आहेत. विजेचा कमी दाब, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे तसेच अचानक जास्त दाबाचा वीजप्रवाह येऊन घरगुती उपकरणे जळण्याच्या घटनांमुळे नागरिक त्रस्त झाले होते.

या समस्येबाबत वारंवार तोंडी तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने परिसरातील महिला व पुरुष नागरिकांनी अखेर महावितरण कार्यालय गाठत आंदोलन केले. यावेळी नागरिकांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना जाब विचारत तात्काळ प्रश्न सोडविण्याची मागणी केली. नागरिकांचा आक्रमक पवित्रा पाहता महावितरणचे अभियंता शंकरवार यांनी तातडीने संबंधित ठिकाणी कर्मचारी पाठवून समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. तसेच नागरिकांसोबत कर्मचारी घटनास्थळी रवाना करण्यात आले. त्यानंतर नागरिकांनी आंदोलन मागे घेतले.

या आंदोलनात जयसिंग शेळके, सोनू इंगोले, सुनिता इंगोले, विमल फुलमाळी, शांताबाई ताठे, कमलाबाई भागवत, शारदा ताठे, दिपाली रोहीमल, मीरा हरकळ, वंदना पवार, खेडेकर सर, हरकळ आबा, त्र्यंबक पवार, भागवत सकलादी, भागवत होंडे, योगेश काठोटे, रुस्तुम सोळंके, निलेश मुंदडा यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते.

### जिल्ह्यातील तरुणाई अंमली पदार्थांच्या विळख्यात : सामाजिक कार्यकर्ते सय्यद खादर यांची जिल्हा पोलिस अधिक्षकांकडे तक्रार : कठोर कारवाईची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** गेल्या काही महिन्यांपासून शहरासह जिल्ह्यातील तरुणाई अंमली पदार्थांच्या विळख्यात मोठ्या प्रमाणात अडकली असून पोलिस प्रशासनाने खूलेआमपणे होणाऱ्या अंमली पदार्थाच्या विक्री विरोधात कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सय्यद खादर यांनी केली आहे.

जिल्हा पोलिस अधिक्षक पंकज कुमावत यांची खादर यांनी सोमवारी भेट घेतली व संपूर्ण शहरासह जिल्ह्यात खूलेआमपणे विक्री होणाऱ्या अंमली पदार्थाविरोधात तक्रारी दाखल केल्या. काही भागात मोठ्या प्रमाणावर टरमीन इंजेक्शन, गांजा, चरस, पंक्चर जोडण्याकरीताची स्टिक फास्ट, व्हाईटनर तसेच नशेच्या विविध प्रकारच्या गोळ्यांची खूलेआमपणे विक्री चालू असून तरुणाईबरोबर शालेय विद्यार्थीसुध्दा या अंमली पदार्थाच्या विळख्यात अडकले आहेत, असे निदर्शनास आणून दिले. मध्यवस्तीतील खंडोबा बाजार, धार रोड, अपना कॉर्नर, वांगी रोड, इकबाल नगर परिसर, दर्गाह रोड, साखला प्लॉट, गंगाखेड रस्त्यावरील हडको, वसमत रस्त्यावरील उघडा महादेव मंदिर परिसर, खानापूर फाटा, एमआयडीसी परिसर तसेच झोपडपट्टी भागांमधून हे अमलीपदार्थ सहज उपलब्ध होत आहेत, असे म्हटले. दरम्यान, जिल्हा पोलिस अधिक्षक कुमावत यांनी या अंमली पदार्थाच्या विक्री विरोधात कठोर कारवाई केली जाईल, असे ठोस आश्वासन दिले.

### रावे कार्यक्रमांतर्गत तरोडा येथे माती परीक्षण उपक्रम : उद्यानविद्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेतीचे मार्गदर्शन

**परभणी,/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या उद्यानविद्या महाविद्यालयाच्या ग्रामीण जागरूकता कार्यानुभव (रावे) कार्यक्रमांतर्गत २२ मे रोजी मौजे तरोडा येथे माती परीक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला गावातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी दत्तक शेतकऱ्यांच्या शेतातून वैज्ञानिक पद्धतीने मातीचे नमुने संकलित केले. मातीचा नमुना घेताना शेतातील विविध ठिकाणांहून ठराविक खोलीपर्यंत माती घेण्याची पद्धत, नमुना स्वच्छ ठेवण्याचे महत्त्व तसेच योग्य पद्धतीने नमुना परीक्षणासाठी पाठविल्यास अचूक अहवाल मिळण्याचे फायदे याबाबत माहिती देण्यात आली. संकलित नमुने पुढील परीक्षणासाठी कृषी विद्यापीठाच्या प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे महत्त्व, जमिनीतील अन्नद्रव्यांची उपलब्धता, योग्य खत व्यवस्थापन, उत्पादन खर्चात बचत तसेच पीक उत्पादन व गुणवत्तेत वाढ याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

### गेल्या दहा दिवसात इंधनात चौथ्यांदा मोठी वाढ : नागरीकांमधून संतप्त प्रतिक्रिया : आधीच इंधन टंचाई, त्यात वाढ

**परभणी,/प्रतिनिधी :** जागतिक पातळीवरील युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात गेल्या दहा दिवसात चौथ्यांदा मोठी वाढ केली.
१५ मे रोजी इंधनात ३ रुपये वाढ करण्यात आली होती. १९ मे रोजी ९० पैसे तर २३ मे रोजीही ९० पैशांनी वाढ करण्यात आली. त्या पाठोपाठ अवघ्या दोन दिवसात म्हणजे आज २५ मे रोजी पेट्रोलच्या दरात २ रुपये ६१ पैसे व डिझेलच्या दरात २ रुपये ७१ पैशांनी वाढ झाली आहे.

दरम्यान, गेल्या दहा दिवसात चौथ्यांदा दरवाढ झाल्याने सर्वसामान्य वाहनधारक अक्षरशः हैराण झाला आहे. आधीच या जिल्ह्यात इंधनाचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा भासत आहे. त्यातच केलेल्या दरवाढीमुळे ग्राहकांच्या खिशास तडाखा बसणार आहे. तसेच महागाईसुध्दा मोठ्या प्रमाणावर वाढणार, असे स्पष्ट संकेत आहेत.

### तुकाराम मुंडे अन्न व औषध प्रशासन आयुक्तपदी रुजू :

**परभणी,/प्रतिनिधी :** संपूर्ण राज्यात अत्यंत धडाडीचे व कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून नावलौकिक असणारे तुकाराम मुंडे हे सोमवारी सकाळी ११ वाजता राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी रुजू झाले आहेत. गेल्या दीड महिन्यापूर्वी मुंडे यांची दिव्यांग सक्षमीकरण विभागातून तडकाफडकी बदली करण्यात आली होती. परंतु, मुंडे यांना अन्य विभागात तात्काळ नियुक्ती करण्याऐवजी राज्य सरकारने पदाच्या प्रतिक्षेत ठेवले होते. त्यामुळे ते कमालीचे नाराज झाले होते. तसेच एका कठोर, कर्तव्यदक्ष अन् प्रामाणिक धडाडीच्या अधिकाऱ्यास दीड महिन्यांपासून पदाविना ठेवल्याबद्दल प्रसारमाध्यमांसह सोशल मिडीयातून मोठ्या प्रमाणावर टिका टिप्पणी सुरु झाली होती. अखेर राज्य सरकारने मुंडे यांचीराज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागात आयुक्तपदी नियुक्ती केली. आठ दिवसांपूर्वीच त्या संबंधीच्या बदलीचे आदेश निघाले होते. त्याप्रमाणे मुंडे हे सोमवारी सकाळी ११ वाजता या विभागात रुजू झाले. दरम्यान, मुंडे यांच्या गेल्या २० वर्षांच्या कालावधीत २५ वेळा बदल्या झाल्या आहेत.

# दत्ता लाड यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मान

**परभणी,/प्रतिनिधी:-** परभणी जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल श्रीरंग देवबा लाड (दादा लाड) यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे आयोजित समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शेती क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत केंद्र शासनाने त्यांची पद्मश्री पुरस्कारासाठी निवड केली होती. त्यांच्या या सन्मानामुळे परभणी जिल्ह्यासह मराठवाड्याच्या



**परभणीच्या शिरपेचात मानाचा तुरा**

शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दरम्यान त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल समस्त परभणीकरांना या गौरवक्षणाचा सार्त अभिमान आहे.

### विधान परिषदेसाठी १९ अर्जांची विक्री

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकार मतदारसंघ निवडणूक-२०२६ प्रक्रियेला सुरुवात झाली असून पहिल्याच दिवशी ९ जणांनी एकूण १९ उमेदवारी अर्ज घेतले.
विधानपरिषद निवडणूक कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १ जून २०२६ आहे. अर्जांची छाननी २ जून रोजी करण्यात येणार असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून निश्चित करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेदरम्यान होणार आहे. तर मतमोजणी २२ जून २०२६ रोजी करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली असून काल मंगळवार दि.२६ मे २६ दुपारी २.५८ पर्यत एकही अर्ज दाखल झाला नाही अशी माहिती प्रशासनाने दिली आहे.



### जिंतूर आगारात एसटी महामंडळ कर्मचारी काँग्रेसची नूतन कार्यकारणी जाहीर; श्रीरंग बर्गे यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**जिंतूर,/प्रतिनिधी :** एसटी महामंडळ कर्मचारी काँग्रेसच्या जिंतूर आगार नूतन कार्यकारणीचा प्रवेश व पदग्रहण सोहळा औंढा कॉर्नर येथील माही हॉटेलमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला। .
काँग्रेस पार्टीचे प्रदेश सेक्रेटरी माननीय श्रीरंग बर्गे साहेब यांच्या नेतृत्वाखाली व जिंतूर शहर काँग्रेस कमिटीच्या नगरसेवकांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला। कार्यक्रमाची प्रस्तावना स्माईल पैलवान ,फेरोज भाई यांनी केली।
कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्रीरंग बर्गे* यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, ''एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांवर सातत्याने अन्याय होत आहे। अनेक कर्मचारी आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत। काँग्रेस पक्ष कर्मचाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असून, त्यांना सर्व सुविधा मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत।'' असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

## जिंतूर वकील संघाच्या नूतन कार्यकारणीची निवड

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर वकील संघाच्या नूतन कार्यकारणीची निवड करण्यात आलीआहे.

वकील संघ जिंतूर येथे सन २०२६ २०२७ ची निवडणुक आज पार पडली. त्यामध्ये एकूण तीन पॅनल मध्ये निवडणूक प्रक्रिया पार पडली. त्यात अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव व सहसचिव या पदासाठी निवडणूक घेण्यात आली.

या निवडणुकीमध्ये अँड विष्णू जाधव हे अध्यक्ष पदासाठी निवडून आले तर उपाध्यक्ष पदासाठी अँड कपिल निकम तर सचिव पदासाठी अँड गजानन नागरे हे निवडून आले तसेच सहसचिव पदासाठी अँड सचिन वाघमारे यांनी निवडणुकीत बाजी मारली. सदरच्या निवडणुकीमध्ये वकील संघातील बहुतांश सदस्यांनी



आपला सहभाग नोंदविला. दरवर्षीप्रमाणे पूर्वीचे कार्यकारणी कालावधी संपल्यानंतर निवडणुक ही वकील संघ जिंतूर येथे हसत खेळत पार पडली. या निवडणुकीमध्ये अँड विष्णू जाधव यांनी अँड रणजित देशमुख व ऍड रमेश भडगळ यांचा पराभव केला तसेच ऍड कपिल निकम यांनी ऍड तारिक देशमुख व अँड मधुकर जोशी यांचा पराभव केला तसेच सचिव पदासाठी अँड गजानन नागरे यांनी अँड विलेश घनसावध अँड दशरथ वाळके यांच्या पराभव केला तर सहसचिव पदासाठी अँड सचिन वाघमारे यांनी अँड बलराम सोनी यांचा मोठा मताधिक्याने पराभव केला. सदरच्या निवडणुकीमध्ये अँड विनोद पाटील यांनी मुख्य निवडणूक अधिकारी तर ऍड रमेश वाकळे यांनी सह निवडणूक अधिकारी म्हणून कार्य पार पाडले. नवनिर्वाचित कार्यकारिणीचे जिंतूर येथील न्यायाधीश श्रीमान तळणीकर साहेब यांचे सह वकील संघातील ज्येष्ठ सदस्य अँड सुंदरराव चव्हाण नागोराव जाधव अँड देसाई मोरे अँड. संजय भांबळे अँड.मधुकर देशमुख अँड. विनोद राठोड नाईक, अँड दत्तराव घुगे, अँड सुधाकर जाधव,ऍड गोपाळ रोकडे अँड सुनील मते, अँड राजेश्वर घुगे, अँड मनोज सारडा, अँड विजय सोनूने , अँड पंकज तिवारी, अँड संतोष घुगे यांचेसह परंपरेनुसार पराभूत झालेल्या उमेदवाराने देखील अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय महा प्रशिक्षण अभियान मुंबईत संपन्न

**जिंतूर,/प्रतिनिधी-** वकील संघ जिंतूर येथे सन २०२६ २०२७ ची निवडणुक आज पार पडली. त्यामध्ये एकूण तीन पॅनल मध्ये निवडणूक प्रक्रिया पार पडली. त्यात अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव व सहसचिव या पदासाठी निवडणूक घेण्यात आली.

या निवडणुकीमध्ये अँड विष्णू जाधव हे अध्यक्ष पदासाठी निवडून आले तर उपाध्यक्ष पदासाठी अँड कपिल निकम तर सचिव पदासाठी अँड गजानन नागरे हे निवडून आले तसेच सहसचिव पदासाठी अँड सचिन वाघमारे यांनी निवडणुकीत बाजी मारली. सदरच्या निवडणुकीमध्ये वकील संघातील बहुतांश सदस्यांनी आपला सहभाग नोंदविला.



दरवर्षीप्रमाणे पूर्वीचे कार्यकारणी कालावधी संपल्यानंतर निवडणुक ही वकील संघ जिंतूर येथे हसत खेळत पार पडली. या निवडणुकीमध्ये अँड विष्णू जाधव यांनी अँड रणजित देशमुख व ऍड रमेश भडगळ यांचा पराभव केला तसेच ऍड कपिल निकम यांनी ऍड तारिक देशमुख व अँड मधुकर जोशी यांचा पराभव केला तसेच सचिव पदासाठी अँड गजानन नागरे यांनी अँड विलेश घनसावध अँड दशरथ वाळके यांच्या पराभव केला तर सहसचिव पदासाठी अँड सचिन वाघमारे यांनी अँड बलराम सोनी यांचा मोठा मताधिक्याने पराभव केला. सदरच्या निवडणुकीमध्ये अँड विनोद पाटील यांनी मुख्य निवडणूक अधिकारी तर ऍड रमेश वाकळे यांनी सह निवडणूक अधिकारी म्हणून कार्य पार पाडले. नवनिर्वाचित कार्यकारिणीचे जिंतूर येथील न्यायाधीश श्रीमान तळणीकर साहेब यांचे सह वकील संघातील ज्येष्ठ सदस्य अँड सुंदरराव चव्हाण नागोराव जाधव अँड देसाई मोरे अँड. संजय भांबळे अँड.मधुकर देशमुख अँड. विनोद राठोड नाईक, अँड दत्तराव घुगे, अँड सुधाकर जाधव,ऍड गोपाळ रोकडे अँड सुनील मते, अँड राजेश्वर घुगे, अँड मनोज सारडा, अँड विजय सोनूने , अँड पंकज तिवारी, अँड संतोष घुगे यांचेसह परंपरेनुसार पराभूत झालेल्या उमेदवाराने देखील अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला.

### जिल्हतील पेट्रोल पंप म्हणजे नो स्टॉक

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरासह जिल्हभरातील पेट्रोप पंपावर सर्रासपणे रोजच नो स्टॉक पे पलक लावण्यात असल्यामुळे वाहनधारक चांगलेच त्रस्त झाले आहेत.
गेल्या काही दिवसापासून शहरातील पेट्रोल पंपावर पेट्रोल, डिझेलच्या रांगा लागलेल्या दिसत आहेत. सध्या मागणीपेक्षा साठा कमी भेटत आहे, त्यामुळे जिल्हयातील पंपावर नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे नो स्टॉक पलक लावलेला पहावयास मिळत आहे.

# परभणीतील आर.पी. हॉस्पिटलमध्ये पहिली किसिंग स्टेंटिंग शस्त्रक्रिया यशस्वी; दोन्ही पाय कापण्यापासून वाचले

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणीकरांसाठी आणि संपूर्ण मराठवाड्याच्या वैद्यकीय क्षेत्रासाठी अत्यंत अभिमानास्पद अशी कामगिरी आर. पी. हॉस्पिटल अँड रिसर्च इन्स्टिट्यूटने केली आहे. रुग्णालयाचे अध्यक्ष तथा परभणीचे आ.डॉ. राहुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमीर खान यांच्या नेतृत्वात मराठवाड्यातील पहिली किसिंग स्टेंटिंग ही अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे.

महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत तब्बल ४ ते ५ लाख रुपये खर्चाची ही शस्त्रक्रिया गरीब रुग्णावर पूर्णपणे मोफत करण्यात आली, ज्यामुळे रुग्णाचे दोन्ही पाय कापण्याची वेळ टळली आहे. ६८ वर्षीय वृद्ध रुग्णाला एओर्टो-बाय इलिॲक ऑक्लूझिव्ह डिसीज या अत्यंत गंभीर आजाराने ग्रासले होते. या रुग्णाच्या दोन्ही पायांमध्ये गँगरीन (पाय कुजणे) सुरू झाले होते. अनेक ठिकाणी पाय कापण्याचा सल्ला देण्यात आला होता, परंतु आर.पी. हॉस्पिटलमधील तज्ज्ञांनी आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या जोरावर या रुग्णाला नवजीवन दिले.

वेळेवर उपचार न केल्यास होणारे भयंकर दुष्परिणाम हा आजार वेळेत ओळखला नाही किंवा उपचार मिळाले नाहीत, तर खालील गंभीर परिस्थिती निर्माण होते:

क्रिटिकल लिंब इस्केमिया पायांमधील रक्तपुरवठा पूर्णपणे बंद झाल्याने असह्य वेदना होतात आणि रुग्णाला रात्रीची झोपही येत नाही.

गँगरीन (पाय कुजणे) रक्तवाहिन्या बंद झाल्यामुळे पायाची बोटे, टाच काळी पडून कुजतात. अंगच्छेदन () गँगरीन वाढल्यामुळे जवळपास ३०% रुग्णांमध्ये गुडघ्याखालून किंवा गुडघ्यावरून पाय कापावा लागतो. गँगरीनचे इन्फेक्शन रक्तामध्ये पसरल्यास सेप्सिस होऊन रुग्णाचा मृत्यू देखील होऊ शकतो. किंवा कायमचे अपंगत्व देखील येवू शकते. पाय गमावल्यामुळे रुग्णाला उर्वरित आयुष्य परावलंबी आणि मानसिक त्रासात जगावे लागते. एओर्टो-बाय इलिॲक ऑक्लूझिव्ह डिसीज ( ) या आजारात पोटातील मुख्य महाधमनी () पासून पायाकडे जाणाऱ्या दोन्ही मुख्य रक्तवाहिन्या (इलिॲक) १०० टक्के बंद होतात.भारतात दर १ लाख लोकांमागे ३ ते ५ रुग्णांमध्ये हा दुर्मिळ व गंभीर आजार आढळतो. याचे प्रमुख कारण म्हणजे अनियंत्रित मधुमेह (), उच्च रक्तदाब ( ), अतिधूम्रपान आणि वाढते वय ही या आजाराची मुख्य कारणे आहेत.

अत्याधुनिक किसिंग स्टेंटिंग म्हणजे काय.? मराठवाड्याचे पहिले व्हॅस्क्युलर



आणि एंडोव्हॅस्क्युलर सर्जन डॉ. मनोज हंबर्डे यांनी या रुग्णावर अत्याधुनिक किसिंग स्टेंटिंग तंत्राचा वापर करून उपचार केले. या पद्धतीमध्ये रुग्णाच्या दोन्ही मांड्यांमधील रक्तवाहिनीतून अतिशय बारीक नळी (कॅथेटर) टाकून, दोन्ही बंद पडलेल्या मुख्य रक्तवाहिन्यांमध्ये एकाच वेळी दोन स्टेंट टाकले जातात. हे दोन्ही स्टेंट पोटातील महाधमनीमध्ये जिथे एकत्र येतात, तिथे ते एकमेकांना स्पर्श करतात. म्हणून याला किसिंग स्टेंटिंग म्हणतात. या आधुनिक शस्त्रक्रियेनंतर अवघ्या १० मिनिटांत रुग्णाच्या पायातील रक्तप्रवाह पूर्ववत सुरू झाला आणि जे पाय कापण्याची वेळ आली होती, त्या पायांनी चालत रुग्ण ४८ तासांत आपल्या घरी रवाना झाला.

आ.डॉ.राहुल पाटील यांनी सांगितले की, ''परभणी व मराठवाड्यातील गरीब रुग्णांना मुंबई-पुण्यासारखे महागडे उपचार येथेच अंतर्गत मोफत उपलब्ध करून देणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. गेल्या ३ वर्षात ५ हजारांहून अधिक रुग्णांवर आम्ही मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना बरे केले आहे.''

आर.पी हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ प्रमोद शिंदे यांनी सांगितले की, ''अशा प्रगत आणि गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया आता परभणीतच उपलब्ध झाल्यामुळे रुग्णांचा मुंबई-पुण्याला जाण्याचा वेळ, प्रवास आणि मोठा आर्थिक खर्च वाचत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# पाकिस्तानचे वर्तमान आणि भविष्य

इतिहासातून काहीही न शिकणाऱ्यांचे ऐतिहासिक नुकसान होत असते, असे म्हणतात. ते पाकिस्तानच्या बाबतीत खरे होईल की काय, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. कारण १९७१ च्या पुनरावृत्तीचे संकेत देणारी वर्तमान स्थिती तिथे निर्माण झाली आहे. १९४७ मध्ये एका धर्माच्या आधारावर निर्माण झालेल्या या देशाला स्वातंत्र्यानंतर लोकशाहीपेक्षा लष्करी राजवटींचा अत्यंत कडू अनुभव आला आहे. यासोबतच धार्मिक कट्टरता, राजकीय अस्थिरता, आर्थिक संकटे, दहशतवाद, प्रादेशिक असंतोष आणि सत्तेचे केंद्रीकरण या समस्यांनी पाकिस्तानला कायम आतून पोखरले आहे. १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तान वेगळा होऊन स्वतंत्र बांगलादेशची निर्मिती झाली तेव्हा तो पाकिस्तानच्या इतिहासातील सर्वांत खणखणीत धडा होता. त्यातून योग्य बोध घेण्यात मात्र पाकिस्तानचे नेतृत्व अपयशी ठरल्याचे सध्याच्या परिस्थितीकडे पाहताना जाणवत आहे. बलुचिस्तानातील वाढता हिंसाचार, सिंधमधील असंतोष आणि पंजाबमधील वाढती नाराजी या सर्व घटनांनी पाकिस्तानच्या राष्ट्रीय एकात्मतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहेत. त्यामुळे धुमसत असलेला पाकिस्तान कधीही नकळत पुन्हा फुटीच्या उंबरठ्यावर जाऊ शकतो यात काही दुमत नाही. भरीस भर म्हणजे अमेरिका आणि इस्रायलने इराणविरुद्ध पुकारलेल्या युद्धामुळे स्थिती अधिकच बिकट झाली आहे. पाकिस्तानची आर्थिक परिस्थितीच खालावलेली नसून, तेथील राजकीय असंतोषालाही आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे तीक्ष्ण धार आल्याचे दिसून येत आहे. सध्या पाकिस्तानी नेतृत्वाचा कसोटीचा काळ असून, सद्य:स्थितीतून योग्य पद्धतीने मार्ग न काढल्यास यादवीसदृश स्थिती निर्माण होण्याची व बलुचिस्तानमध्ये रक्तरंजित संघर्ष पेटण्याची शक्यता आहे. शिवाय, सिंध आणि पंजाब प्रांतांमध्येही टोकाचा प्रांतवाद वाढण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पाकिस्तानचे सर्व प्रांत एका धाग्यात बांधून ठेवणे तेथील नेतृत्वाला अतिशय कठीण जाणार आहे.

अलिकडेच क्वेट्टा शहराजवळ रेल्वे मार्गावर झालेल्या भीषण स्फोटात दोन डझनाहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. या हल्ल्याची जबाबदारी बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) या सशस्त्र फुटीरतावादी संघटनेने स्वीकारली आहे. यापूर्वी जाफर एक्स्प्रेस रेल्वेचे अपहरण, शेकडो प्रवाशांना ओलिस धरल्याचा दावा आणि त्यानंतर झालेल्या रक्तरंजित संघर्षामुळे बलुचिस्तान पुन्हा जगभरात चर्चेत आला होता. या घटना केवळ दहशतवादी कारवाया तर आहेतच; शिवाय त्या पाकिस्तानात खोलवर रुजलेल्या प्रादेशिक असंतोषाचे प्रतीक आहेत. बलुचिस्तान हे पाकिस्तानच्या एकूण भूभागापैकी जवळपास निम्मे क्षेत्र व्यापणारे राज्य आहे. नैसर्गिक वायू, तांबे, सोने आणि इतर खनिज संपत्तीने समृद्ध असलेल्या या प्रदेशाला विकासाच्या बाबतीत मात्र सतत दुय्यम स्थान मिळाले अशी स्थानिकांची भावना आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांमध्ये मागासलेपण कायम राहिल्याने तेथील तरुणांमध्ये असंतोष वाढत गेला. त्यामुळे अनेक राष्ट्रवादी संघटनांनी स्वतंत्र बलुचिस्तानची मागणी उचलून धरली. परंतु, पाकिस्तानने त्याकडे पुरेसे लक्ष दिले नाही. म्हणून बीएलएसारख्या संघटनांनी तर सशस्त्र संघर्षाचा मार्ग स्वीकारला आहे. रेल्वे मार्ग, लष्करी तळ, सरकारी संस्था आणि चीनशी संबंधित प्रकल्पांवर होणारे हल्ले हे या संघर्षाचे वाढते स्वरूप दर्शविणारे आहे. बलुचिस्तानातील परिस्थिती पाकिस्तानसाठी अधिक धोकादायक ठरत आहे, कारण हा प्रदेश सामरिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. ग्वादर बंदर आणि चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर (सीपीईसी) यासारखे अब्जावधी डॉलर्सचे प्रकल्प याच भागात आहेत. चीनने पाकिस्तानच्या विकासासाठी केलेल्या मोठ्या गुंतवणुकीचे भविष्यही या प्रदेशाच्या स्थैर्यावर अवलंबून आहे. त्यामुळे पाकिस्तानचे लष्कर येथील संघर्ष मोडून काढण्यासाठी कठोर कारवाया करीत आहे. इतिहासाचा अनुभव असा आहे की, सैनिकी शक्तीने जनतेचा रोष दाबता येत असला तरी तो संपवता येत नाही. सिंधमधील परिस्थितीही फारशी वेगळी नाही. पाकिस्तानची आर्थिक राजधानी कराची आणि देशाच्या महसुलात मोठे योगदान देणारा हा प्रांत गेल्या अनेक दशकांपासून केंद्र सरकारविरोधातील असंतोषाचा केंद्रबिंदू राहिला आहे. सिंधी राष्ट्रवादी संघटनांचा आरोप आहे की, सिंधमधील नैसर्गिक संसाधनांचा आणि आर्थिक उत्पन्नाचा लाभ स्थानिकांना पुरेशा प्रमाणात मिळत नाही. कराचीतील वांशिक संघर्ष, राजकीय हिंसा आणि वाढती आर्थिक विषमता यामुळे असंतोष अधिक गडद झाला आहे. आजही काही संघटना अधिक स्वायत्तता किंवा स्वतंत्र सिंधुदेशची मागणी करीत आहेत. आर्थिक आणि राजकीय संकट अधिक तीव्र झाल्यास या मागण्यांना अधिक बळ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पंजाब हा पाकिस्तानचा सर्वांत मोठा, प्रभावशाली आणि सत्तेचा केंद्रबिंदू असलेला भाग मानला जातो. लष्कर, नोकरशाही आणि राष्ट्रीय धोरणांमध्ये पंजाबी लोकांचे वर्चस्व असल्याचा आरोप इतर प्रांतांकडून केला जातो. त्यामुळे पंजाबमध्ये विभाजनवादी चळवळ नसली तरी तेथील बदलती राजकीय परिस्थिती पाकिस्तानसाठी धोक्याची घंटा ठरू शकते. माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या अटकेनंतर पंजाबमध्ये निर्माण झालेली जनभावना आणि लष्कराविरुद्ध व्यक्त झालेला रोष अभूतपूर्व असा होता. पाकिस्तानच्या इतिहासात प्रथमच पंजाबसारख्या प्रदेशात लष्करी व्यवस्थेबद्दल उघडपणे नाराजी व्यक्त झाल्याचे दिसले होते. पंजाबमधील जनतेचा विश्वास सत्ताव्यवस्थेवरून उडाला तर पाकिस्तानच्या एकात्मतेचा आधारस्तंभच कमकुवत होऊ शकतो, असे म्हणता येईल. या सर्व घडामोडींच्या केंद्रस्थानी आर्थिक संकट हा महत्त्वाचा घटक आहे. पाकिस्तान आज अभूतपूर्व आर्थिक अडचणीतून जात आहे. परकीय कर्जाचा वाढता बोजा, महागाई, बेरोजगारी, घटणारी परकीय गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कठोर अटी यामुळे सामान्य नागरिकांचे जीवन फार संघर्षमय झाले आहे. आर्थिक संकटकाळात प्रादेशिक मुद्यांवरील असंतोष अधिक तीव्र होतो. विकासाचे लाभ समान पद्धतीने वाटले जात नाहीत तेव्हा उपेक्षित प्रदेशांमध्ये वेगळेपणाच्या भावना बळकट होतात. पाकिस्तानमध्ये आज नेमके हेच चित्र दिसत आहे.

याच संदर्भात १९७१ चा इतिहास पुन्हा आठवतो. पूर्व पाकिस्तानातील बंगाली जनतेच्या भाषक, सांस्कृतिक आणि राजकीय हक्कांकडे दीर्घकाळ दुर्लक्ष करण्यात आले होते. आर्थिक संसाधनांचे असमान वाटप आणि राजकीय प्रतिनिधित्वाचा अभाव यामुळे असंतोष वाढत गेला होता. अखेरीस तो स्वतंत्र बांगलादेशच्या निर्मितीत परिवर्तित झाला होता. आज बलुचिस्तान आणि सिंधमध्ये व्यक्त होणाऱ्या तक्रारींचे स्वरूप काही प्रमाणात त्याच धर्तीचे असल्याचे अनेक अभ्यासकांचे मत आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या धोरणकर्त्यांनी या संकेतांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. पाकिस्तानचे लष्कर अजूनही प्रभावशाली आहे, हे खरे. तेथे नाममात्र कां असेना, प्रशासकीय यंत्रणा कार्यरत आहे. मात्र एवढ्याने संकट टळेल असे वाटत नाही. विभाजनवादी विचारांना बळ देणाऱ्या सर्व समस्या कायम आहेत आणि वाढतही आहेत. पाकिस्तान आज एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. बलुचिस्तानातील बंदुकांचा संघर्ष, सिंधमधील असंतोष, पंजाबमधील रोष, आर्थिक दिवाळखोरीची भीती आणि राजकीय संघर्ष या सर्व समस्या परस्परांशी जोडलेल्या आहेत. या प्रश्नांची उत्तरे केवळ लष्करी कारवायांमध्ये किंवा दडपशाहीत सापडणार नाहीत. प्रांतांना अधिक अधिकार, संसाधनांचे न्याय्य वाटप, स्थानिक लोकांना विकासात सहभाग आणि लोकशाही संस्थांचे बळकटीकरण या मार्गानेच दीर्घकालीन समाधान मिळू शकते. पण, तेवढी समज पाकिस्तानातील राज्यकर्त्यांना नाही आणि लोकही त्यांना तसा आग्रह करण्याची शक्यता नाही. पाकिस्तानने १९७१ मध्ये विभाजन अनुभवले. आता पुन्हा तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानकडे अजूनही सुधारण्याची संधी असली तरी ती किती काळ उपलब्ध राहील, हा खरा आणि निर्णायक प्रश्न आहे.

---

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# नव्या मध्यपूर्वेची निर्मिती?

‘हमास’ने ७ ऑक्टोबर २०२३ रोजी केलेल्या हल्ल्यानंतर इस्रायलने दिलेल्या प्रत्युत्तराने जगासाठी दोन गोष्टी स्पष्ट केल्या. पहिली म्हणजे इस्रायल आता ‘प्रतिकारात्मक संरक्षण’ या जुन्या चौकटीत विचार करत नाही आणि दुसरी म्हणजे इस्रायलने स्वतःच्या सुरक्षिततेची व्याख्याच बदलली आहे. आता त्यांच्यासाठी सीमा म्हणजे फक्त नकाशावरील रेषा राहिलेल्या नाहीत, तर संभाव्य धोक्यांपासून दूर ठेवलेले विस्तृत प्रभाव क्षेत्र बनले आहे. ही मानसिकता अचानक निर्माण झालेली नाही. तिची मुळे इस्रायलच्या स्थापनेपासूनच्या इतिहासात आहेत. १९४८ मध्ये इस्रायलची स्थापना झाली आणि त्याच क्षणी अरब-इस्रायल संघर्षाची सुरुवात झाली. त्यानंतर १९६७ मधील सहा दिवसांचे युद्ध, १९७३ चे योम किप्पूर युद्ध, लेबनॉनमधील संघर्ष, पॅलेस्टिनी उठाव या सर्व घटनांनी इस्रायलच्या राष्ट्रीय मानसावर एक खोल परिणाम केला. ‘आपण वेढलेलो आहोत’ ही भावना इस्रायली समाजाच्या राजकीय विचारधारेचा केंद्रबिंदू बनली. याच भावनेतून ‘सुरक्षा’ हा शब्द इस्रायलमध्ये अत्यंत व्यापक अर्थाने वापरला जातो. इतर देशांसाठी सुरक्षा म्हणजे सीमांचे रक्षण; पण इस्रायलसाठी सुरक्षा म्हणजे संभाव्य शत्रूंची क्षमता नष्ट करणे. म्हणूनच गाझातील ‘हमास’ असो, लेबनॉनमधील ‘हिजबुल्लाह’ असो किंवा सीरियातील इराणसमर्थित गट; इस्रायल या फक्त शेजारील शक्ती मानत नाही, तर भविष्यातील अस्तित्वाला धोका मानतो. या पृष्ठभूमीवर ‘ग्रेटर इस्रायल’कडे पाहिले, तर त्यामागे केवळ धार्मिक राष्ट्रवाद नाही, तर सुरक्षा, लोकसंख्या, पाणी, व्यापारमार्ग आणि भू-राजकीय प्रभाव यांचेही गणित आहे.

तपशिलात जाऊन पाहता, दक्षिण लेबनॉनमधील लितानी नदीचा परिसर हा केवळ लष्करीदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर जलस्रोतांच्या दृष्टीनेही संवेदनशील भाग आहे. गोलन टेकड्यांचे महत्त्वही असेच आहे. इस्रायलमध्ये दोन प्रवाह स्पष्ट दिसतात. एक, पॅलेस्टिनी प्रश्नाचे कायमस्वरूपी समाधान दोन स्वतंत्र राष्ट्रांच्या निर्मितीत आहे, तर दुसरा, अधिक आक्रमक प्रवाह मानतो की पॅलेस्टिनी राष्ट्राची कल्पनाच इस्रायलच्या सुरक्षेसाठी धोकादायक आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर दुसऱ्या प्रवाहाचा प्रभाव अधिक असल्याचे मानले जाते. वेस्ट बँकमध्ये वाढणाऱ्या ज्यू वसाहती हा त्याचाच भाग आहे. आंतरराष्ट्रीय समुदाय अनेक वर्षांपासून या वसाहतींना बेकायदेशीर मानतो; प्रत्यक्षात इस्रायलने त्या विस्तारण्याचे धोरण थांबवलेले नाही. रस्ते, सुरक्षा तळ, पायाभूत सुविधा, सैन्य संरक्षणाच्या माध्यमातून वेस्ट बँक हळूहळू इस्रायली प्रभावक्षेत्रात खोलवर समाविष्ट होत आहे. यामुळे इस्रायल प्रत्यक्षात ‘दोन राष्ट्र समाधान’ संपवण्याच्या दिशेने जात आहे का, असा प्रश्न पडतो.

आज आधीच गाझातील युद्धामुळे नव्या पिढीत संताप आणि असुरक्षितता वाढली आहे. उद्ध्वस्त घरे, विस्थापन, बेरोजगारी आणि सततचे युद्ध या परिस्थितीत शांततावादी विचार कमकुवत होतात आणि अतिरेकी संघटनांना समर्थन वाढते. याचा दुसरा परिणाम अरब जगतात दिसू शकतो. काही वर्षांपूर्वी अब्राहम करारांमुळे इस्रायल आणि काही अरब राष्ट्रांमधील संबंध सुधारू लागले होते. संयुक्त अरब अमिराती, बहरीन, मोरोक्को यांनी इस्रायलशी संबंध प्रस्थापित केले. सौदी अरेबियासोबतही संवाद सुरू होता; पण गाझामधील युद्धानंतर ही संपूर्ण प्रक्रियाच धोक्यात आली. या संपूर्ण घडामोडीत आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे इराण. इराण स्वतःला पॅलेस्टिनी प्रश्नाचा सर्वांत मोठा समर्थक म्हणून सादर करतो. ‘हिजबुल्लाह’, ‘हमास’ आणि इतर शिया-सुन्नी गटांना मिळणारा त्यांचा पाठिंबा हा केवळ धार्मिक नाही, तर इस्रायलविरोधी प्रादेशिक रणनीतीचा भाग आहे. इस्रायलने शेजारील भागांमध्ये कायमस्वरूपी प्रभाव वाढवल्यास इराण अधिक आक्रमक प्रतिसाद देऊ शकतो. त्यामुळे मध्यपूर्वेत थेट प्रादेशिक युद्धाचा धोका वाढतो.

‘ग्रेटर इस्रायल’ या चर्चेचा एक मानवी पैलूही आहे, जो अनेकदा दुर्लक्षित राहतो. युद्धाच्या नकाशांमध्ये दिसणारे भूभाग हे प्रत्यक्षात लाखो लोकांचे जीवन असते. गाझामधील उद्ध्वस्त शहरे, लेबनॉनमधील विस्थापित कुटुंबे, सीरियातील अस्थिरता या सगळ्यांच्या केंद्रस्थानी सामान्य नागरिक आहेत. प्रत्येक लष्करी कारवाई नवीन जखमा निर्माण करते आणि त्या जखमा पुढच्या संघर्षांचे कारण बनतात. इतिहास सांगतो की लष्करी विजय कायमस्वरूपी राजकीय समाधान देत नाहीत. अमेरिकेने अफगाणिस्तान आणि इराकमध्ये हे अनुभवले. रशियाला युक्रेनमध्ये त्याचा अनुभव येत आहे आणि इस्रायललाही कदाचित हे वास्तव स्वीकारावे लागेल की केवळ शक्तीच्या आधारे दीर्घकालीन शांतता निर्माण होत नाही. या ठिकाणी आंतरराष्ट्रीय समुदायाची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. संयुकक्त राष्ट्रसंघ, अमेरिका, युरोपीय देश आणि अरब राष्ट्रांनी केवळ तात्पुरत्या युद्धविरामांवर भर दिला, तर परिस्थिती पुन्हा पुन्हा भडकत राहील. खरे आव्हान म्हणजे असा राजकीय आराखडा तयार करणे, ज्यात इस्रायलची सुरक्षा आणि पॅलेस्टिनींचे स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी एकत्र शक्य होतील; पण आजचे वास्तव पाहता, तो मार्ग अधिक कठीण होत चालला आहे. इस्रायलला वाटते की पॅलेस्टिनी गट त्यांचे अस्तित्वच नाकारतात, तर पॅलेस्टिनींना वाटते की इस्रायल त्यांची भूमी आणि ओळख हळूहळू संपवत आहे. म्हणून ‘ग्रेटर इस्रायल’ हा केवळ एक राजकीय शब्द नाही. तर मध्यपूर्वेतील भविष्यातील संघर्ष, राष्ट्रवाद, धार्मिक ओळख, सामरिक विस्तार आणि मानवी वेदना यांचा गुंतागुंतीचा संगम आहे.

आज इस्रायल अंगीकारत असलेली दिशा त्या देशाला अल्पकालीन सुरक्षा देऊ शकते; पण दीर्घकालीन स्थैर्य मिळवून देईल का, हा खरा प्रश्न आहे. कारण शेवटी कोणतेही राष्ट्र फक्त भिंती, सीमा आणि सैन्य यांच्या आधारावर टिकत नाही. त्याला शेजाऱ्यांसोबत सहअस्तित्वाची राजकीय इच्छाशक्तीही लागते आणि मध्यपूर्वेत आज पाहायला मिळणारी सर्वाधिक दुर्मिळ गोष्ट म्हणजे परस्पर विश्वास. ‘ग्रेटर इस्रायल’ म्हणजे नेमके काय, याबाबत अनेक व्याख्या आहेत. काही ज्यू राष्ट्रवादी गटांच्या मते, बायबलमध्ये वर्णन केलेल्या ऐतिहासिक भूमीपर्यंत इस्रायलचा प्रभाव आणि नियंत्रण वाढले पाहिजे. यात सध्याच्या इस्रायलव्यतिरिक्त वेस्ट बँक, गाझा, दक्षिण लेबनॉन, गोलन टेकड्या आणि काही अतिरेकी विचारांनुसार जॉर्डनपर्यंतचा भूभाग समाविष्ट होतो. अर्थात, इस्रायलचे अधिकृत धोरण म्हणून ही भूमिका स्पष्टपणे स्वीकारलेली नाही; पण गेल्या काही वर्षांमधील राजकीय वक्तव्ये, वाढते ज्यू वसाहतीकरण आणि शेजारी देशांमधील लष्करी हस्तक्षेप यामुळे या संकल्पनेला नव्याने बळ मिळताना दिसते. काही नेत्यांनी तर दक्षिण लेबनॉनमधील लितानी नदीपर्यंत इस्रायलची सुरक्षा सीमा असावी, अशी मागणी केली आहे.

संयुक्त राष्ट्रसंघासह अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांनी परिस्थितीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली; परंतु इस्रायलने ‘राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न’ म्हणत या कारवायांचे समर्थन केले. या युद्धात इस्रायलने गाझाच्या सीमेलगत विस्तृत बफर झोन निर्माण केला. या कृतीमुळे इस्रायल केवळ ‘हमास’चा नायनाट करू इच्छितो, की गाझाच्या भूगोलातच कायमस्वरूपी बदल घडवू पाहतो, असा प्रश्न निर्माण झाला. ‘हिजबुल्लाह’ आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष हा अनेक दशकांपासून सुरू आहे; मात्र २०२३ नंतर या संघर्षाची तीव्रता अधिक वाढली. इस्रायली सैन्याने सीमापार कारवाया वाढवल्या आणि अनेक किलोमीटर आतपर्यंत लष्करी उपस्थिती निर्माण केली. इस्रायल याला ‘सुरक्षा पट्टा’ म्हणत असला, तरी अरब देश आणि विश्लेषकांच्या मते हे दीर्घकालीन नियंत्रणाचे संकेत आहेत. सीरियामध्ये अस्थिरतेचा फायदा इस्रायल घेत असल्याचा आरोप होतो. बशहर-अल-आसाद यांच्या सरकारची पकड कमकुवत झाल्यानंतर इस्रायलने गोलन टेकड्यांपलीकडे आपली कारवाई वाढवली. इस्रायलचा दावा असा की इराणसमर्थित गट व शस्त्रसाठे रोखण्यासाठी हे आवश्यक आहे; परंतु ‘सुरक्षा’ या नावाखाली इस्रायल आपल्या प्रभाव क्षेत्राचा विस्तार तर करत नाही ना, असा प्रश्न उपस्थित होतो. ‘ग्रेटर इस्रायल’ ही संकल्पना कट्टर राष्ट्रवादी घोषणांपुरती राहिलेली नाही, तर प्रत्यक्ष धोरणात्मक शक्यता वाटू लागली आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# जैसे ज्याचे कर्म तैसे...

केलेल्या प्रत्येक कर्माचे फळ भोगावेच लागते, हा निसर्गाचा अलिखित नियम आहे. वाट्याला येणारा हा भोग कधी चेहऱ्यावर हास्य फुलवितो तर कधी डोळ्यांमधून अश्रूंच्या धाराही गाळतो. अशीच काहीशी परिस्थिती सध्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची झाली आहे. भाजपच्या पाठीत खंजीर खुपसून केलेल्या विश्वासघाताची फळे आता उबाठाला चाखायला मिळत आहेत. स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्याईने या पक्षाला काही काळापुरते तारले असले तरी शेवटी धुरा सांभाळणारा चालक निष्णात असावा लागतो. संघटन आणि कार्यकर्ता घडविण्यासाठी रक्ताचे पाणी करून जमिनीवर उतरावे लागते. चार भिंतीच्या आड स्वतःला कोंडून राजकारण करण्याचे ते दिवस आता गेले. सामान्य जनतेची नस न ओळखल्याने काँग्रेसची जी गत झाली, तीच स्थिती आता उबाठाची होऊ लागली आहे. नेमक्या याच कमतरतेमुळे उबाठाला घरघर लागली. पक्ष फुटला, चाळीस आमदारांना आपल्या सोबत घेत एकनाथ शिंदे यांनी मूळ शिवसेना पक्ष आपल्या ताब्यात घेतला. तेव्हापासून पक्षाला लागलेली गळती, अंतर्गत कलह आणि नेतृत्वाच्या अभावामुळे हा पक्ष कायमचा रसातळाला जाईल की, काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

एकेकाळी राज्याच्या सत्ताकेंद्रामध्ये सत्ता उपभोगत रिमोट कंट्रोल आपल्या हाती ठेवणारे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे राज्याच्या राजकारणातूनच बाहेर फेकले गेले आहेत की काय असे वाटते. मागील विधानसभा निवडणुकीमध्ये त्या पक्षाचे फक्त २० आमदार निवडून आले. स्व. बाळासाहेब ठाकरे हयात असताना त्याना कधीच सत्तेचा मोह झाला नाही. त्यामुळे मुख्यमंत्रिपदाची धुरा कार्यकर्त्यांना देऊन एक वेगळा पायंडा पाडला आणि स्वतः हिंदुत्वाची मशाल कायम धगधगत ठेवून शिवसेनेला राज्यामध्ये घराघरात पोहोचविण्याचे कार्य केले. मात्र, बाळासाहेबांचे समर्पण, त्याग आणि हिंदुत्वाला तिलांजली देत उद्धव ठाकरे यांनी त्यास कायमची सोडचिठ्ठी दिली. रोज भाजपला शिव्या घालून मतदारांच्या मनामध्ये पक्षप्रेम रुजविता येत नाही, हे सांगण्यासाठीही आज उद्धव ठाकरे यांच्याकडे माणसे शिल्लक नाहीत. हाती सत्ता नसली की, पक्ष बेफाम होतो तीच अवस्था सध्या उबाठाची झाली आहे. उबाठाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते दुसऱ्या पक्षाचा झेंडा आपल्या हाती घेताना दिसून येत आहे. वाशीममध्ये दिवसरात्र एक करून सुरेश मापारी यांनी उबाठाला जिल्ह्यामध्ये जिवंत ठेवले होते. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही श्रेय मिळत नसल्याचे बघून मापारी यांनी आपल्या शेकडो समर्थकासह भाजपला जवळ केले. मराठवाडा आणि कोकणातही उबाठामध्ये अंतर्गत नाराजीने कळस गाठला असून, ती कधी उफाळून येईल याचा नेम नाही. सलग पाचवेळा खासदार म्हणून निवडून येणाऱ्या भावना गवळी यांनाही जो पक्ष सांभाळू शकला नाही, त्या पक्षाच्या भविष्याबद्दल काय बोलावे? ज्यावेळी शरद पवारांनी सापळा रचून उद्धव ठाकरे यांना आपल्या जाळ्यात ओढले त्याचवेळी उद्धव ठाकरे यांचे भविष्य ठरले होते. सत्तेच्या मोहापायी मूळ विचारांना तिलांजली देणे हे राज्यामधील जनतेच्या पचनी पडले नाही. त्यानंतर कार्यकर्त्यांची उपेक्षा आणि गटबाजीने उबाठा त्रस्त झाली. एखादा प्रादेशिक पक्ष म्हटला की, त्यास बऱ्याच मर्यादाही असतात. राज्यातील जनतेच्या आकांक्षाना खरे उतरले तरच प्रादेशिक पक्षांना पाय पसरायला संधी मिळते.



बाळासाहेब ठाकरेंनंतर उद्धव ठाकरे कोणत्याच कसोटीवर खरे उतरले नाही. त्यामुळे युती तोडणे हे त्यांच्यासाठी आत्मघातकी पाऊल ठरले. आपल्या क्षमतांची मर्यादा ओळखून जर वाट चोखाळली असती तर आज राज्यामध्ये वेगळे चित्र बघायला मिळाले असते. अथक परिश्रम, विचाराची स्पष्टता आणि आपल्या ध्येयधोरणांशी निष्ठा असल्याने भाजपने जवळपास अख्खा देश पादाक्रांत केला आहे. पश्चिम बंगाल हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. त्यामुळे आज राजकारणी भाजप प्रवेशासाठी रांगेत उभे आहेत. काही वर्षांपूर्वी आपले फक्त दोनच खासदार निवडून आले म्हणून भाजपने हार न मानता मार्गक्रमण सुरू ठेवले. आपल्या ध्येयधोरणांमध्ये असलेली नैतिकता ही भाजपची आयुष्यभराची शिदोरी आहे. त्यामुळेच जनतेच्या कसोटीवरही हा पक्ष खरा उतरला आहे, हे उबाठाला ज्यावेळी कळेल तोवर कदाचित वेळ निघून गेलेली असेल.

९८८१७१७८५६

---

## इतस्तत:

दत्तात्रेय आंबुलकर

# उन्हाच्या झळा : कंपन्यांचा जिव्हाळा

एप्रिल, मे आणि जून या उन्हाळ्याच्या कालावधीत वाढत्या गरमीपोटी उष्णता व उष्णतेची लाटसदृश स्थिती ही गेल्या काही वर्षांपासून तशी नित्याची बाब समजली जाते. यातूनच सर्व जण ‘नेमेचि मग येतो उन्हाळा’ असा रखरखीत अनुभव घेत असतात. जागतिक हवामानतज्ज्ञांच्या अभ्यासानुसार, २०२५ या वर्षीचा उन्हाळा जागतिकसंदर्भात सर्वाधिक उष्ण म्हणून नोंदविण्यात आला होता. अशा वेळी विविध कंपन्या-कार्यालयांमध्ये, विशेषतः प्रवास करणाऱ्या वा कार्यालयाबाहेर राहून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची वेगळीच कसोटी असते. उन्हाळी गरमीच्या वार्षिक समस्येवर मात करण्यासाठी कंपनी व्यवस्थापन व व्यवस्थापक पण विशेष स्वरूपात प्रयत्न करीत असतात.

या संदर्भात मुळात देशांतर्गत भर उन्हाळ्यात निवडक ठिकाणी असणारे तापमान व त्यातील चढ-उतार समजून घेणेही तितकेच आवश्यक आहे. या संदर्भात या वेळच्या उन्हाळ्याच्या पहिल्या टप्प्यात म्हणजेच, एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात राष्ट्रीय स्तरावरील तापमान सरासरी स्वरूपात ४० ते ४६ टक्के होते. त्यातही उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यात एप्रिलच्या शेवटी ४७.६ टक्के सेल्सिअस एवढ्या तापमानाची नोंद झाली असून, आगामी दोन महिन्यांच्या दरम्यान देशातील ऊन आणि उन्हाळा यांची स्थिती विविध प्रदेशांत सर्वसाधारणपणे अशाच स्वरूपाची राहील, असा अंदाज केंद्र सरकारच्या हवामान खात्यातील विषयतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. हवामानशास्त्र क्षेत्रातील याच जाणकारांनी हवामान-तापमानाच्या संदर्भात प्रभाव टाकणाऱ्या व प्रचलित अशा ‘अल-निनो’चा या संदर्भात विशेष अभ्यास केला. या अभ्यासानुसार, सर्वसाधारणपणे ‘अल-निनो’चा प्रादुर्भाव व प्रभाव उन्हाळ्यात सागरी क्षेत्रातील तापमान मर्यादेबाहेर वाढल्यामुळे होतो. यावर्षी ‘अल-निनो’चा पर्यावरणीय प्रभाव अधिक राहण्याचे अनुमान अभ्यासकांनी काढले आहे.

‘अल-निनो’चा प्रभाव व परिणाम वातावरणासह उन्हाच्या तीव्रतेपासून पावसाच्या प्रमाणापर्यंत होत असतो, असे अभ्यासांति सिद्ध झाले आहे. भारताच्या संदर्भात ‘अल-निनो’चा मोठ्या प्रमाणावर होणारा परिणाम म्हणजे, अतिवृष्टी व मोठ्या प्रमाणावरील उष्णतेची लाट, अशा दोन्ही प्रकारच्या अतिरेकी स्वरूपात दिसून येतो. यावर्षी पण उर्वरित उन्हाळ्यात सूर्याच्या तापाच्या जोडीलाच उष्णतेच्या लाटांच्या प्रतापाला भारताला सामोरे जाण्याचा अभ्यासपूर्ण इशारा देण्यात आल्याने साऱ्यांच्याच काळजीत स्वाभाविकपणे भर पडली आहे. या वर्षीच्या उन्हाळ्याच्या तीव्रतेच्या पृष्ठभूमीवर अनेक ठिकाणी कंपन्यांनी पुढाकार घेतल्याचे प्रामुख्याने दिसून येते. यासाठी कंपन्यांनी चाकोरीबद्ध प्रयत्न न करता, विविध प्रकारे पुढाकार घेतल्याचे प्रामुख्याने दिसून येते. यामध्ये व्यावसायिक गरजा लक्षात घेतानाच, कामांच्या प्राथमिकतेमध्ये लवचीकपणे बदल करणे, उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन कामाची प्रक्रिया व ठिकाणांमध्ये बदल करणे, गरमीचे स्वरूप लक्षात घेऊन कामाच्या तासांची फेररचना करणे इत्यादीचा समावेश केला आहे, तर केवळ कार्यालयीन स्वरूपाचे व्यावसायिक काम करणाऱ्यांसाठी व्यावसायिक आवश्यकता व कर्मचाऱ्यांच्या गरजांचा समन्वय साधून यापूर्वीच विविध कारणांनी प्रस्थापित अशा घरून काम करण्याची सुलभ मुभा पुन्हा प्रदान केली आहे.



यासंदर्भात विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, ‘मर्सिडीज बेंझ’, ‘नो ब्रोकर डॉट कॉम’, ‘सॅव्हिलिस इंडिया’ यासारख्या कंपन्यांनी तीव्र उन्हापासून कर्मचाऱ्यांना होणारा त्रास कमी व्हावा, यादृष्टीने व्यापक प्रमाणावर घरून काम करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन दिले असून, त्याला कर्मचाऱ्यांकडूनसुद्धा चांगला प्रतिसाद मिळत आहे. ‘ई-कॉम’ क्षेत्रातील आघाडीवरील अशा ‘इटर्नल’ ग्रुपसारख्या कंपन्या भरउन्हाळ्यात भटकंतीसह काम करणाऱ्या आपल्या कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या विक्री केंद्रस्थानी थंड पाण्याची मोठ्या प्रमाणात सोय करण्याशिवाय कूलर्सची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय, त्यांच्या कर्मचाऱ्यांना उन्हात फिरताना सहजपणे उपयोगी पडतील अशी ग्लुकोजसह पिण्याच्या पाण्याची पाकिटे मुबलक प्रमाणात उपलब्ध करून दिली आहेत. बांधकाम क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर काम करणाऱ्या कर्मचारी-कामगारांसाठी त्यांच्या आवश्यकतेनुसार, ताक देण्याचा उपक्रम काही बांधकाम-प्रकल्प व्यवस्थापन कंपन्यांनी सुरू केला आहे, हे विशेष! कर्मचारी निवड व्यवस्थापन क्षेत्रात काम करणाऱ्या ‘सीआयईएन-एचआर’ कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य मिश्रा यांच्यानुसार, उन्हाची वाढती तीव्रता व त्यामुळे कर्मचाऱ्यांना होणारा अथवा होऊ शकणारा त्रास लक्षात घेता, काही कंपन्यांनी त्यांच्या कामाचे फेरनियोजन करून कंपनीचे काम व्हावे व कर्मचाऱ्यांना उन्हाची झळ बसू नये, यासाठी कर्मचाऱ्यांच्या कामाचे निश्चित-निर्धारित व प्रसंगी लवचीक अशा पद्धतीने नियोजन केले असून, हा प्रयोग उभयपक्षी परिणामकारकरीत्या फायदेशीर ठरला आहे. मालाची वाहतूक, ने-आण व प्रत्यक्ष थेट विक्री करणाऱ्या कर्मचाऱ्यांना उन्हामुळे येणारा थकवा व त्रास आटोक्यात आणण्यासाठी विशेषत: ‘ई-कॉमर्स’सह ‘लॉजिस्टिक’ कंपन्यांनी आपल्या विक्री केंद्र, मालवाहतूक करणारी वाहने व भरउन्हात विशेषत: थेट विक्री करणाऱ्या कामगारांच्या संख्येत वाढ केली आहे. यामुळे अशा कर्मचाऱ्यांच्या प्रवासाच्या अंतरामध्ये घट होऊन त्यांचा अप्रत्यक्षपणे ऊन आणि उन्हाळ्यापासून बचाव होऊ लागला आहे.

उन्हाची ही काहिली जूनपर्यंत सुरू राहणार असल्याच्या भारतीय हवामान खात्याच्या नव्या अंदाजानुसार, कंपन्यांनी कर्मचाऱ्यांच्या संदर्भात उन्हामुळे होऊ शकणाऱ्या उष्माघात वा तत्सम आजारांवर प्रतिबंधात्मक नियंत्रण ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांमध्ये संवाद व प्रशिक्षणासह जागृती निर्माण करण्यावर भर दिला आहे. यामध्ये आगामी महिन्यात कर्मचाऱ्यांनी घ्यावयाच्या विशेष काळजीअंतर्गत त्यांचे खानपान, उन्हात फिरताना व काम करताना घ्यावयाची काळजी याबद्दल मार्गदर्शन करण्यात येत आहे. याच्याच जोडीला कर्मचाऱ्यांनी प्रदीर्घ तास काम करू नये, शक्यतो सावलीचा वापर करावा, पेयपानाच्या वेळा पाळाव्यात इ. बाबींचे कटाक्षाने पालन करण्यात येत असून, त्यातून भरउन्हाळ्यात कंपनी-व्यवस्थापनाला कर्मचाऱ्यांप्रति असणारा जिव्हाळाच दिसून येतो.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

---

## वाचक पत्रे

### वाढता वाढता वाढे...तापमान...!

दिवसेंदिवस सूर्य आग ओकत आहे आणि तापमान वाढत आहे. काही वर्षांपूर्वी ४० अंश हे सर्वोच्च तापमान होते. आता तेच तापमान ४६ अंशांपर्यंत गेले आहे. गेल्या काही वर्षांपासून सगळ्याच शहरात एकल घरे पाडून तिथे उंच इमारती निर्माण होत आहेत. या बहुमजली इमारती बांधताना त्या परिसरातील मोठी झाडे व्यत्यय आल्याने तोडली जातात. वृक्ष लावणे, त्याचे रक्षण करणे तर दूरच; जी आहेत ती तोडली जात आहेत. सगळीकडे सिमेंट, काँक्रीटने विकास साधला जात आहे. जंगले नाहीशी होत आहेत. घरोघरी आणि कार्यालयात लागलेले वातानुकूलित यंत्र मोठ्या प्रमाणावर उष्णता निर्माण करत आहे आणि या सर्वांचा परिणाम तापमान वाढीत होत आहे. घरोघरी असणारी वाहने, पेट्रोल, डिझेल, कोळशाचा अमर्याद वापर केल्याने हवेत विषारी व उष्णता वाढणारे वायू निर्माण होत आहेत. खरोखरच निसर्ग आपल्याच करणीचे फळ आपल्याच ओंजळीत टाकत आहे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

### फॅशनचे वेड ठीक; पण संस्कृतीही जपावी...

आजकाल तर प्रत्येक जण आपली स्टाईल व्यक्त करण्यासाठी वेगवेगळ्या फॅशन ट्रेंड्सचा अवलंब करत आहे. कपड्यांपासून ज्वेलरी, स्टायलिश जॅकेट्स, फुटवेअर आणि ॲक्सेसरीजपर्यंत. फॅशन ही केवळ परिधानांचा विषय नाही, तर ती स्वतःची ओळख, भावना आणि व्यक्तिमत्त्व व्यक्त करण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक व्यक्ती आपली शैली वापरून अनोखी ओळख तयार करू शकतो, त्यामुळे आत्मविश्वास आणि सृजनशीलता वाढते. मात्र, आपली परंपरा आणि संस्कृती विसरता कामा नये. फॅशन म्हणजे बाह्यरूपाला आकर्षक बनवण्याची कला; ती केवळ कपडे किंवा स्टाईलपुरती मर्यादित नसते, तर व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वास आणते. संस्कृती म्हणजे आपली भाषा, परंपरा, कला, सण-उत्सव, वेशभूषा, मूल्ये ही आपली खरी ओळख आहे. आधुनिक ट्रेंड स्वीकारताना पारंपरिक सौंदर्य आणि संस्कृतीची जोड दिली, तर व्यक्तिमत्त्व अधिक खुलते. उदा. भारतीय पारंपरिक पेहराव आधुनिक डिझाईन सोबत जुळवला तर फॅशनेबल दिसतो. संस्कृती जपणे म्हणजे आपल्या परंपरा, मूल्ये आणि सांस्कृतिक वारसा जपणे. जर आपण ही संस्कृती जपली नाही, तर ती केवळ फॅशन किंवा दिखावा म्हणून बघितली जाऊ शकते. फॅशन ही केवळ कपड्यांची स्टाईल नसून ती एक ओळख, आत्मविश्वास आणि अभिव्यक्ती असते. साडी, कुर्ता, पंजाबी, फेटा, नथ, पैठणी यासारख्या पोशाखांना आधुनिक टच दिला तरीही ते आपले वैशिष्ट्य टिकवून ठेवतात. फॅशन म्हणजे फक्त पाश्चात्त्य कपडे नव्हेत; ती परंपरागत पोशाखांनाही नव्या रूपात मांडण्याची कला आहे. यामुळे आपण जगासमोर आधुनिकतेसोबतच आपल्या संस्कृतीची श्रीमंतीही दाखवू शकतो. फॅशनची धुंदी असावी, पण संस्कृतीची जाणीव कायम असावी.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### युगपुरुष स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक तेजस्वी, प्रखर आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर. २८ मे हा दिवस त्यांचा जन्मदिन, जो संपूर्ण भारतात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती म्हणून मोठ्या अभिमानाने साजरा केला जातो. त्यांच्या कार्याचे स्वरूप अत्यंत व्यापक आहे. सावरकर केवळ एक क्रांतिकारक नव्हते, तर ते एक महान विचारवंत, लेखक, कवी, इतिहासकार आणि समाजसुधारकही होते. सावरकरांच्या जीवनाचे सर्वांत मोठे ध्येय पूर्ण स्वातंत्र्य हे होते. त्यांनी लंडनमध्ये असताना अभिनव भारत या क्रांतिकारी संघटनेची स्थापना केली. १८५७ च्या उठावाला त्यांनी भारताचे पहिले स्वातंत्र्यसमर असे संबोधले आणि त्या काळातील ब्रिटिशांच्या इतिहासाला खोडून काढत भारतीयांमध्ये क्रांतीची ठिणगी टाकली. त्यांची लेखणी ही तलवारीसारखीच धारदार होती. सावरकरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगताना अंदमानच्या कोठडीत खूप हाल सोसले तरीही त्यांची स्वातंत्र्य मिळविण्याची जिद्द कमी झाली नाही. त्या काळात ज्या भिंतींवर त्यांनी आपल्या नखांनी स्वातंत्र्यवीरतेचा इतिहास कोरला, त्या आजही त्यांच्या त्यागाची साक्ष देतात. त्यांनी कविता, नाटके, कादंबऱ्या आणि आत्मचरित्रात्मक लेखनातून राष्ट्रभक्तीची भावना जागृत ठेवली. ने मजसी ने परत मातृभूमीला हे त्यांचे गाणे आजही प्रत्येक भारतीयाच्या अंगावर रोमांच उभे करते.

सावरकर हे विज्ञानाची कास धरणारे विचारवंत होते. त्यांनी अंधश्रद्धा दूर करून आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी प्रबोधन केले. सावरकर जयंतीच्या निमित्ताने आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, स्वातंत्र्य मिळवणे जितके कठीण होते, तितकेच ते टिकवणे आणि देश बलवान करणे महत्त्वाचे आहे. सावरकरांचे देशभक्ती आणि आत्मनिर्भरता हे विचार आजच्या पिढीसाठी सदैव प्रेरणादायी आहेत. थोर क्रांतिकारकाला, मातृभूमीच्या या महान पुत्राला विनम्र अभिवादन!

**वर्षा आवदे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# परळीत नपा च्या हलगर्जीपणामुळे दिवसाढवळ्या स्ट्रीट लाईटचा झगमगाट

## विजेचा अपव्यय; संतप्त नागरिकांकडून प्रशासनाला सवाल



**परळी वैजनाथ** | परळी नगरपालिकेचा अजब आणि ढिसाळ कारभार पुन्हा एकदा नागरिकांसमोर आला असून दिवसाढवळ्या सूर्याच्या लख्ख प्रकाशात शहरातील स्ट्रीट लाईट सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. चांदापूर रोडलगतच्या हनुमान नगर परिसरातील रस्त्यावरील कोनीकॉल खांबांवरील स्ट्रीट लाईट दिवसा सुरू असल्यामुळे विजेचा मोठ्या प्रमाणात अपव्यय होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

एकीकडे राज्यात वाढते वीज संकट, तर दुसरीकडे नागरिकांना वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचा त्रास सहन करावा लागत असताना देखील अशा परिस्थितीत नगरपालिकेकडून विजेच्या वापराबाबत आवश्यक ती दक्षता घेतली जात नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. भर उन्हाळ्यात तीव्र उकाडा आणि वाढत्या तापमानामुळे नागरिक हैराण झाले असताना दिवसाढवळ्या स्ट्रीट लाईट सुरू ठेवणे म्हणजे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा कळस असल्याचे अनुभवयास येत आहे.

यापूर्वीही शहरातील अनेक भागांमध्ये अशा प्रकारे स्ट्रीट लाईट दिवसा सुरू असल्याचे वारंवार दिसून येते. संबंधित विभागाकडून योग्य नियोजन, नियमित तपासणी आणि देखभाल केली जात नसल्यामुळे अशा घटना घडत आहेत. त्यामुळे नगरपालिकेच्या कामकाजावर एक प्रकारे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, विजेचा अपव्यय रोखण्यासाठी नगरपालिकेने तत्काळ उपाययोजना कराव्यात, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी स्ट्रीट लाईट व्यवस्थेवर नियंत्रण ठेवावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच या अक्षम्य निष्काळजीपणाकडे नगरपालिका पदाधिकारी, आणि प्रशासनातील जबाबदार अधिकारी लक्ष देणार का, असा सवालही नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

# लग्नानंतर अवघ्या 12 दिवसांत दुर्दैवी घटना : तलाठ्याची आत्महत्या

अंबाजोगाई : अंबाजोगाई शहरालगतच्या मोरेवाडी परिसरात एका नवविवाहित तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना सोमवारी दुपारी उघडकीस आली. गणेश दत्तू कोळी (मूळ रा. नांदुर्गा, ता. औसा) असे मृत तरुणाचे नाव असून ते चंद्रपूर महसूल विभागात तलाठी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

माहितीनुसार, गणेश कोळी यांचा विवाह 13 मे 2026 रोजी बीड येथील दिपाली यांच्याशी झाला होता. दिपाली या अंबाजोगाई येथील अपर पोलीस अधीक्षक कार्यालयातील फॉरेन्सिक विभागात कंत्राटी स्वरूपात कार्यरत आहेत. विवाहानंतर हे दाम्पत्य मोरेवाडी परिसरात भाड्याच्या घरात वास्तव्यास होते.

सोमवारी दुपारी पत्नी कामानिमित्त बाहेर गेल्यानंतर गणेश यांनी राहत्या खोलीत गळफास घेतल्याचे समोर आले. घटना लक्षात आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असून मंगळवारी शवविच्छेदनानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. आत्महत्येमागील कारणांचा पोलीस तपास सुरू आहे.

# २०१७ मधील बीड जि.प.सदस्यांना मतदानाचा अधिकार द्या-अशोक लोढा

## अन्यथा निवडणूक स्थगीत करा !

बीड (प्रतिनिधि): राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणुका घोषित झाल्या आहेत.या निवडणुकीत पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिकां मधील निवडून आलेले सदस्य मतदार म्हणून सहभागी होतात. यामधून विधान परिषदेचे सदस्य निवडले जातात. परंतु न्यायालयीन प्रक्रियेमुळे बीड जिल्हा परिषदेची निवडणूक न झाल्याने बीड ग्रामीण जिल्ह्याचे प्रतिनिधित्व अबाधित राखण्यासाठी २०१७ मधील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती यांना मतदानाचा हक्क बजावण्याची संधी द्यावी, अन्यथा धाराशिव- बीड लातूर- निवडणुक स्थगित करण्यात यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा परिषद सदस्य तथा शहर अध्यक्ष अशोक लोढा यांनी केली आहे.

महाराष्ट्रात द्विगृह विधानमंडळ व्यवस्था असुन विधान परिषद हे राज्य विधिमंडळाचे उच्च सभागृह आहे.स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक ही राज्याच्या लोकशाही व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया मानली जाते.मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मुंबई विभागातील अनेक महत्त्वाच्या मतदारसंघांचा समावेश आहे. मराठवाड्यातील धाराशिव- बीड- लातूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ राजकीय दृष्ट्या महत्त्वाची मानली जाते. बीड मध्ये नगरपालिकेच्या निवडणुका झाल्या परंतु जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका होऊ शकल्या नाही. धाराशिव- बीड- लातूर मतदार संघाची मतदार यादी संविधानिक दृष्ट्या अपूर्ण आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व नाकारले जाणार आहे.

भारतीय राज्यघटनेने मतदानाचा मूलभूत अधिकार व्यापक दृष्टिकोनातून दिलेला आहे. बीड मतदार संघाचा अविभाज्य भाग असेल आणि या मतदारसंघातील जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य संविधानिक दृष्ट्या मूळ मतदार असतील तर त्यांना मतदानाचा अधिकार दिलाच गेला पाहिजे. अन्यथा घटना आणि कायद्याची पायमल्ली होऊ शकते. मूळ मतदारांना हक्क बजावण्यासाठी २०१७ मधील जिल्हा परिषद सदस्य,पंचायत समिती सभापती यांना मतदानाचा अधिकार द्यावा किंवा धाराशिव-बीड-लातूर मतदार संघाची निवडणूक स्थगित करावी. शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन बीड जिल्ह्याला न्याय द्यावा अशी आग्रहाची मागणी अशोक लोढा यांनी केली आहे.

# श्री.योगेश्वरी मंदिरात 'ज्ञानप्रसादालय' ग्रंथालयाचे उद्घाटन

## रोटरी क्लब व श्री.योगेश्वरी देवल कमिटी यांचा उपक्रम



अंबाजोगाई : "बुके नको, पुस्तक द्या" या अभिनव संकल्पनेतून अंबाजोगाईत साकारलेल्या 'ज्ञानप्रसादालय' या ग्रंथालयाचे उद्घाटन शनिवारी श्री योगेश्वरी मंदिर परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

अंबाजोगाई पुस्तकांचं गावं या उपक्रमात सहभाग नोंदवत रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व श्री. योगेश्वरी देवल कमेटी यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे होते.तर उद्घाटक म्हणून देवल कमिटीचे सचिव गिरधारीलालजी भराडिया, रोटरीचे उपप्रांतपाल प्रवीण देशपांडे, प्रांतसचिव डॉ. राजगोपाल तापडिया,

देवल कमिटीचे विश्वस्त कमलाकर चौसाळकर,उल्हास पांडे, हंसराज देशमुख, प्रवीण दामा, पूजा कुलकर्णी,गौरी जोशी, रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी, प्रकल्प प्रमुख अविनाश मुडेगावकर, सहप्रकल्प प्रमुख धनराज सोळंकी,सौ. संगीता लातुरे, शर्मिष्ठा देशपांडे, मंचावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना गिरधारीलाल भराडिया म्हणाले की मंदिरात येणाऱ्या भक्तांसाठी महाप्रसाद व ज्ञानप्रसाद या दोन्ही गोष्टी मिळणार आहेत. हे ग्रंथालय सुसज्ज व अत्याधुनिक करून भक्तांना इथे अंबाजोगाईच्या इतरही पर्यटन स्थळांची माहिती देण्यात येणार आहे.

आपल्या अध्यक्षीय समारोपात बोलताना सुधीर लातुरे म्हणाले की वाचन संस्कृती टिकली तरच खऱ्या अर्थाने प्रगतीची दिशा साध्य होईल. हा मंदिरात सुरू झालेला उपक्रम प्रेरणादाई असल्याचे ते म्हणाले. यावेळी प्रवीण देशपांडे, प्रा. रोहिणी पाठक,यांनी मनोगत व्यक्त केले.

दीपप्रज्वलन व फित कापून 'ज्ञानप्रसादालय' या ग्रंथालयाचे उद्घाटन झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प प्रमुख अविनाश मुडेगावकर यांनी केले. संचलन सुरेखा काळे, शिल्पा सेलुकर यांनी तर उपस्थितांचे आभार धनराज सोळंकी यांनी मानले. या कार्यक्रमास महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बुकेऐवजी पुस्तकांच्या भेटीतून साकारले ज्ञानप्रसादालय:

पत्रकार अविनाश मुडेगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या पुढाकाराने वाढदिवसा निमित्त बुके नको बुक द्या. या राबवलेल्या उपक्रमातून १ हजार पुस्तके जमा झाली होती. या ग्रंथसंपदेचे रूपांतर आता ज्ञानप्रसादालयात झाले आहे.

# शरीर सुदृढ असेल तरच राष्ट्र सक्षम बनते : प्रा. बाबासाहेब देशमुख

## हनुमान व्यायाम शाळेच्या संस्कार शिबिराचा उत्साहात समारोप

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : "शरीर सुदृढ असेल तरच राष्ट्र सक्षम बनते. अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण होते," असे प्रतिपादन श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्टचे सचिव प्रा. बाबासाहेब देशमुख यांनी केले. ते श्री. हनुमान व्यायाम शाळेच्या उन्हाळी व्यायाम व संस्कार शिबिराच्या समारोप समारंभात बोलत होते.

हनुमान व्यायाम शाळा व वैद्यनाथ बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचा समारोप रविवारी उत्साहात संपन्न झाला. महिनाभर चाललेल्या या शिबिरात शहरातील विद्यार्थी, युवक व युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासासाठी योगासन, प्राणायाम, सूर्यनमस्कार, मल्लखांब, कुस्ती, कराटे, बॉक्सिंग, जलतरण, लेझीम, मार्चपास, तलवारबाजी आदी विविध प्रकारांचे मोफत प्रशिक्षण देण्यात आले. समारंभास प्रसिद्ध शल्य चिकित्सक डॉ. हरिश्चंद्र वंगे, वैद्यनाथ बँकेचे उपाध्यक्ष रमेश कराड, विजयकुमार मेनकुदळे, उमाताई समशेट्टे, अभयकुमार ठक्कर, राजाभैया पांडे, डॉ. अंकुश जबदे, डॉ. रवींद्र ईटके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दत्ताप्पा ईटके गुरुजी यांनी युवकांनी मोबाईल आणि आभासी दुनियेपेक्षा व्यायाम व संस्कारांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. यावेळी शिबिरात उत्कृष्ट सहभाग नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. जिमनॅस्टिकमध्ये सुवर्णपदक मिळविणाऱ्या सान्वी सौंदळे हिचा विशेष गौरव करण्यात आला. "अशा शिबिरांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व शिस्त निर्माण होते," असे सान्वीने सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी हनुमान प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन प्रा. बाबासाहेब देशमुख यांच्या हस्ते तर ध्वजारोहण रमेश कराड यांच्या हस्ते करण्यात आले. विदेह संगीतालयाच्या कलाकारांनी स्वागतगीत सादर केले. तसेच ४० शिक्षक व २० महिला प्रशिक्षकांचा गौरव करण्यात आला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी दत्तात्रय ईटके (गुरुजी), वैजनाथ ईटके, सुभाष नानेकर, त्र्यंबक काटकर, अमर देशमुख, विलास आरगडे, प्र. अतुल दुबे, सुरेश टाक यांच्यासह सर्व प्रशिक्षक व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आर्या मॅडम व अरगडे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सुरेश टाक यांनी केले. समारोप कार्यक्रमास पालक, विद्यार्थी आणि नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# आदित्य कृषी महाविद्यालयात २६० विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

## बँकिंग परीक्षांची भीती सोडा, यशाचे मार्ग सोपे होतील : सिद्धेश्वर कोगे

**बीड** | शहरातील आदित्य कृषी महाविद्यालयात 'बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी आणि कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना 'अल्फा कोचिंग' (छत्रपती संभाजीनगर) चे संचालक व बँक ऑफ इंडियाचे माजी सहाय्यक व्यवस्थापक सिद्धेश्वर कोगे म्हणाले विद्यार्थांनो बँकिंग परीक्षांची भीती सोडा, यशाचे मार्ग सोपे होतील. त्यांनी बँकिंग क्षेत्रातील विविध पदे, स्पर्धा परीक्षांची रचना आणि तयारीची रणनीती यावर सविस्तर प्रकाश टाकला. यावेळी २६० विद्यार्थी उपस्थित होते.

आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्व विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवले जातात. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा शैक्षणिक आलेख उंचावत आहे. याचाच भाग म्हणून, स्पर्धा परीक्षांची अचूक रणनीती हा विद्यार्थांसाठी विशेष कार्यक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून 'अल्फा कोचिंग' (छत्रपती संभाजीनगर) चे संचालक व बँक ऑफ इंडियाचे माजी सहाय्यक व्यवस्थापक सिद्धेश्वर कोगे (एम.एस्सी. अॅग्री इकॉनॉमिक्स) आणि मॅनेजर संजीत कदम उपस्थित होते. कोगे यांनी विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी सर्वप्रथम मनातील अभ्यासाची, विशेषतः गणित व इंग्रजी विषयांची भीती काढून टाकणे आवश्यक आहे. ही भीती नष्ट झाल्यास यश मिळवणे कसे सोपे होते, हे त्यांनी विविध उदाहरणांसह स्पष्ट केले. त्यांनी थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधत गणिताचे प्रश्न सोडवून घेतले आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवला. विद्यार्थ्यांनी बँकिंगसह कृषी क्षेत्रातील इतर स्पर्धा परीक्षांनाही प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांनी मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना कशा पद्धतीने स्पर्धात्मक वातावरणात घडवले जाते, याचा आढावा घेतला. भविष्यातही येथील विद्यार्थी विविध उच्च पदांवर चमकतील असा विश्वास व्यक्त करत त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या शिबिराला सहाव्या व आठव्या सत्रातील तब्बल २६० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना बँकिंग आणि कृषी क्षेत्रातील उच्च शिक्षणाच्या संधींची स्पष्ट दिशा मिळाली.

# सिरसाळ्यात पूज्य भन्ते व भिक्खू संघाच्या उपस्थितीत धम्मक्रांतीचा उत्साह; धनंजय मुंडे यांच्या हस्ते भव्य बुद्ध विहाराचे लोकार्पण

परळी (प्रतिनिधी):

परळी तालुक्यातील सिरसाळा येथे रविवार, २४ मे २०२६ रोजी एक ऐतिहासिक सुवर्णक्षण साजरा झाला. चक्रवर्ती सम्राट अशोक बुद्ध विहारामध्ये तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या बुद्धरूपाचे अनावरण आणि विहाराच्या देखण्या इमारतीचा लोकार्पण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. पूज्य भंते आणि भिख्खू संघाच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याने संपूर्ण परिसर धम्ममय झाला होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भंते डॉ. धम्मदीप महाथेरो (अध्यक्ष, भीम जन्मभूमी, महू) आणि भंते प्रज्ञापिओ (बोधगया) यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे व पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सिरसाळा गावातील प्रमुख मार्गांवरून भगवान बुद्धांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. "बुद्धं शरणं गच्छामि"च्या जयघोषाने वातावरण भारून गेले होते. मिरवणुकीनंतर भंतेजींसह सुमनबाई अश्रुबा किरवले व मनीषा महादेव किरवले यांच्या हस्ते बुद्धरूपाचे अनावरण करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात भिक्खू संघाने गाथा पठण करून मूर्तीचे विधिवत अनावरण केले. यावेळी भिक्खुणी आर्याजी रूपनंदा यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, श्रीलंकेप्रमाणेच येथेही बुद्धपूजेला श्रद्धा आणि शिस्तीचे महत्त्व असावे. सिरसाळा येथील विहार हे केवळ इमारत नसून ते संस्कार केंद्र बनावे, जिथे धम्म स्कूल आणि भिक्खू निवास सुरू व्हावा.

भंते डॉ. धम्मदीप महाथेरो यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या "गाव तिथे




बुद्ध विहार आणि ग्रंथालय" या स्वप्नाचा उल्लेख करत सिरसाळ्यातील कार्याचे कौतुक केले. तर भंते प्रज्ञापिओ यांनी "शील हाच खरा अलंकार आहे" असे सांगत, मानवी कल्याणासाठी धम्माचे आचरण करण्याचे आवाहन केले.

तिसऱ्या सत्रात परळीचे आमदार तथा माजी सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते विहाराच्या आकर्षक इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी स्मार्ट सिटीचे आयुक्त रवींद्र जोगदंड, प्रशांत बलवाड (स्वीय सहाय्यक, राज्यपाल राजस्थान), उमेश सोनवणे (उपआयुक्त), प्रभाकर वंजारे (सेवानिवृत्त डेप्युटी कमिशनर), सिद्धार्थ धनंजकर (तहसीलदार), सुमित बनसोडे (आकाशवाणी) यांसह अॅड. दिलीप उजगरे, बालाजी गायकवाड, समाधान किरवले,तानाजी व्हावळे, भगवान साकसमुद्रे, मिलिंद चोपडे , गणेश गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी रामदादा किरवले व अच्युत बप्पा किरवले यांचा त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच मुंबईचे उपजिल्हाधिकारी महादेव किरवले यांनी बुद्धमूर्ती दानस्वरूपात देऊन समाजासमोर एक आदर्श ठेवला. कार्यक्रमाची सांगता प्रसिद्ध भीमशाहीर आनंद शिंदे यांच्या पहाडी आवाजातील भीमगीतांनी झाली. हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी सम्राट अशोक बौद्ध विहार समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व यशोधरा महिला मंडळाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# सौर ऊर्जा योजनेत राज्यात बीड जिल्हा प्रथम ; बीड जिल्ह्यात गेवराई प्रथम

## अनिल बोर्डे व शाम मोरे यांच्या अथग प्रयत्नांना यश

गेवराई ( प्रतिनिधी) महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वकांक्षी सौर ऊर्जा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून बीड जिल्हाने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच बीड जिल्ह्यात गेवराई तालुका यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे शेतकरी ग्राहका मध्ये आनंदाचे वातावरण आहे. या मध्ये बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे आणि योजनेचे गेवराईचे समन्वयक श्याम मोरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे यश प्राप्त झाले आहे.

बीड जिल्ह्यातून ५५ ६१८ अर्ज दाखल झाले असून सर्वच अर्ज निकाली निघाले आहेत. गेवराई तालुक्यातील चालू महिन्यात १०३ अर्ज राहिले आहेत. त्यामुळे गेवराई तालुका बीड जिल्हात प्रथम आला आहे. जिल्ह्यात चालू महिन्यात सध्या फक्त ५०३ अर्ज शिल्लक आहेत. गेल्या महिन्यात ३२४ ०५ सौर ऊर्जा पंप बसविण्यात आले आहेत. या यशाबद्दल संपूर्ण जिल्ह्यातून कौतुक होत आहे. बीड जिल्ह्याला सौर ऊर्जा लाभ मिळण्यासाठी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन, मुख्य अभियंता, महासंचालक महाऊर्जा पुणे, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता गेवराई यांच्याकडे वारंवार दिनांक ९ /१/२०२४ पासून जिल्ह्याला सौर ऊर्जा योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी अनिल बोर्डे यांनी विविध प्रशासकीय पातळीवर तीव्र संघर्ष केला आहे. केवळ पत्रव्यवहार न थांबता त्यांनी प्रत्यक्ष भेटी घेऊन वेळोवेळी अधिकाऱ्यासोबत सविस्तर चर्चा केल्या व सौर ऊर्जाचा पूर्ण अभ्यास केला. आणि जिल्ह्यातील शेतकरी ग्राहकाची गरज महाराष्ट्र शासन व प्रशासनासमोर वेळोवेळी मांडली. प्रशासन विषय मार्गी लावण्यात कमी पडत असल्यामुळे बोर्डे यांनी थेट मुख्यमंत्री राज्याचे ऊर्जामंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. बीड जिल्हाला उत्पन्न स्रोत कमी असल्यामुळे बीड जिल्ह्यासाठी विशेष निधी आणि मंजुरी मिळवून घेण्यासाठी त्यांनी शासनावर दवाब गट निर्माण केला. त्यांच्या या अथांग प्रयत्नामुळेच बीड जिल्हा ला योजनेत अग्रस्थान मिळवून देण्यात यश आले. या ऐतिहासिक यशाच्या पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यात सौर ऊर्जा योजनेचे श्याम मोरे यांनी एक विशेष पत्रकार परिषद घेतली. यावेळी बोलताना मोरे यांनी अत्यंत आनंद व्यक्त केला आणि "आमच्या सामूहिक प्रयत्नांना अखेर मोठे यश आले आहे " असे संबोधित केले गेवराई तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून ५५६१८ अर्ज प्राप्त झाले आहेत. हा आकडा इतर जिल्ह्याच्या तुलनेतून सर्वाधिक आहे. एवढ्या मोठ्या संख्येने अर्ज येणे हे जिल्ह्यात झालेल्या जनजागृतीचे आणि लोकांच्या बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र पदाधिकारी विश्वासाचे प्रतिक आहे. असे त्यांनी नमूद केले. बीड जिल्हा ने सौर ऊर्जा सारख्या पर्यावरण पूरक आणि शाश्वत विकास योजनेत मिळवलेल्या या प्रथम क्रमांका मुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या कामगिरी बद्दल अनिल बोर्डे, श्याम मोरे, प्रा. भानुदास फलके ग्राहक पंचायत चे सर्व पदाधिकारी, यांचे सर्व स्तरावरून भरभरून कौतुक होत आहे. या योजनेमुळे जिल्ह्यातील हजारो शेतकरी ग्राहकांना उन्हाळ्यात हक्काची आणि दिवसा वीज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याप्रकरणी जिल्ह्यातील सर्व मा.संपादक व प्रतिनिधी यांनी वेळोवेळी बातमी प्रसिद्ध करून ग्राहक पंचायत कार्यात मोलाचे सहकार्य केले आहे. या यशात त्यांचा देखील सहभाग आहे.

# पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मुंबईत 'वृक्षारोपण मोहिम' ; अभिनेत्री शिल्पा शेट्टीही उपस्थित

## हरित व प्रदूषणमुक्त मुंबईसाठी वृक्षारोपण मोहिमा महत्वाच्या



मुंबई : डी. वाय. पाटील इंटरनॅशनल स्कूल, वरळी आणि भामला फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज 'वृक्षारोपण मोहिमेचे' आयोजन करण्यात आले. या उपक्रमात राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सहभागी होत विद्यार्थ्यांसोबत वृक्षारोपण केले.

या मोहिमेप्रसंगी जलसंपदा मंत्री जयकुमार रावल, मुंबईच्या महापौर रितू तावडे, प्रसिद्ध सिने अभिनेत्री शिल्पा शेट्टी, भामला फाउंडेशनचे अध्यक्ष असिफ भामला, सेहर भामला, शाळेचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व मोठ्या संख्येने पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

वृक्षारोपणानंतर बोलताना मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या, "वाढत्या शहरीकरणात आपल्या शहराला हिरवेगार आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी अशा मोहिमा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एक झाड म्हणजे हजारो लोकांना ऑक्सिजन. डी. वाय. पाटील स्कूल आणि भामला फाउंडेशनने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्या म्हणाल्या.

लातूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.**

## उद्या शासकीय रुग्णालयांची 'ओपीडी' बंद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : काही दिनदर्शिकांमध्ये बुधवार, २७ मे २०२६ रोजी बकरी ईदची सुट्टी दर्शवण्यात आली असली, तरी महाराष्ट्र शासनाने बकरी ईदची सार्वजनिक सुट्टी गुरुवार, २८ मे २०२६ रोजी निश्र्चित केली आहे. त्यामुळे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, २८ मे २०२६ रोजी बंद राहील.

शासकीय रुग्णालयांचा बाह्यरुग्ण विभाग बुधवार, २७ मे २०२६ रोजी नियमित वेळेप्रमाणे पूर्णवेळ सुरू राहील, तर गुरुवार, २८ मे रोजी सुट्टी असल्याकारणाने पूर्णपणे बंद राहणार आहे.

शासकीय रुग्णालयातील ओपीडी विभाग गुरुवारी बंद असला, तरी रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास अविरत सुरू राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संतोषकुमार डोपे यांनी कळविले आहे.



# विविध वृत्त...

## लातूर-कळंब राज्य मार्गावरील पुलांचे काम अर्धवट

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : लातूर - कळंब राज्यमार्गावर मोठया प्रमाणात हजारो वाहनांची ये-जा असते. या मार्गाचे काम गेल्या ४ ते ५ वर्षापासून संथ गतीने सुरू आ-हे. तांदूळजा ते लातूर एमआयडीसी पर्यंत ८० टक्के रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. मात्र रस्त्याचे काम क-ांही ठिकाणी निकृष्ट दर्जाचे झाले आहे. या नव्या रस्त्यावरून जाताना वाहने कांही ठिकाणी जम्पींग करत आहेत. बेसावध असणाऱ्या प्रवांना याचा फटका बसत आहे. तसेच या मार्गावर बांधलेल्या पुलांचे काम अजूनही अर्धवट अवस्थेत आ-हे. कांही ठिकाणी रस्त्याच्या साईड पट्टया फाटत आहेत. त्यामुळे वेगात असलेले वाहन आचनक खड्यात जावून आपघात होण्याची शक्यता आहे.

## कन्हेरी चौकातून दुचाकी चोरली

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : शहराच्या कन्हेरी चौकातील टायर पंक्चरच्या दुकानासमोर लावलेली काळ्या रंगाची होंडा शाईन मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना रविवारी (दि. २४) सकाळी १० ते ११.३० च्या सुमारास घडली.

फिर्यादी पाशासाब गनीसाब शेख हे टायर पंक्चर दुकानदार रविवारी सकाळी त्यांच्या कामात व्यस्त होते. त्याच वेळी अज्ञात चोरट्यांनी दुकानापुढे लावलेली होंडा शाईन कंपनीची मोटारसायकल (एमएच २४ एक्स ३२९१) चोरून नेली. शेख यांच्या लक्षात येताच त्यांनी सर्वत्र मोटारसायकलीचा शोध घेतला. परंतु शेजाऱ्याकडे व नातेवाईकांकडेही ती नसल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात धाव घेतली. शेख यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरोधात गु.र. नं. ३८३/२६, कलम ३०३ (२) बीएनएस नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील करीत आहेत.

## अकरावी प्रवेशासाठी कॉलेज पसंतीक्रम कार्यक्रम

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : अकरावी प्रवेशासाठी उत्सुक असलेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजला पसंतीक्रम देण्याचा कार्यक्रम सुरू झाला आहे. आता पसंतीक्रम दिला की, संबंधित महाविद्यालयात विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेश मिळणार आहे. सध्या अकरावी प्रवेशाची सर्वत्र चर्चा सुरू आहे. यावर्षी गतवर्षीसारखी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून प्रवेश प्रक्रिया लवकर सुरू झाली.

यावर्षी दहावी, बारावी बोर्ड परीक्षेचे निकालही लवकर लागले.

त्यामुळे अकरावी प्रवेशाची प्रक्रिया लवकर सुरू झाली. आता विद्यार्थी कमी आणि अकरावी प्रवेशाच्या जागा अधिक, असा विषम हिशेब समोर येत असला तरी प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतरच कोणत्या उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांत प्रवेश किती झाले, हे कळणार आहे.

सध्या पसंतीक्रम देऊन महाविद्यालय निवडीची प्रक्रिया सुरू आहे. पसंती दिल्यास उच्च माध्यमिक विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालयांत किती प्रवेश होणार हे समोर येईल.

### खंडापूर पादुका दर्शन सोहळा आर्थिक व्यवहारातील दोषींवर कारवाईच्या मागणीसाठी
## अ .भा. भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्यावतीने पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : लातूर तालुक्यातील खंडापूर येथे दि. २२ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत पार पडलेल्या उत्सव संतांचा, कुंभमेळा वारकऱ्यांचा पादुका दर्शन सोहळ्यासाठी देणगी स्वरूपात आलेल्या रकमेमध्ये कोट्यवधी रुपयांच्या अपहार प्रकरणी दोषी असणाऱ्या किशोर जाधव शिवणीकर व त्याच्या सहकाऱ्यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी आज , मंगळवारी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वाखाली लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

या पादुका दर्शन सोहळ्यात कोट्यवधी रुपयांचा अपहार करण्यात आल्याची तक्रार अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवं ब्रिक्स ह्युमन राईट मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी एका लेखी निवेदनाद्वारे लातूरच्या पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. खंडापूर येथे पार पडलेल्या पादुका दर्शन सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील अनेक संत आले होते. सोहळ्यामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, तेलंगणा आदी भागातून वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या सोहळ्याचा जवळपास ६० लाखांहून अधिक भाविकांनी आनंद घेतला होता. सोहळ्यासाठी अंदाजे ३७०० देणगी




पुस्तिका छापण्यात आल्या होत्या. प्रत्येक देणगी पावती पाच हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेची आहे. या सोहळ्यासाठी छोटे कदम माऊली महाराज व तोतया भामटा किशोर जाधव शिवणीकर याने आपल्या सहकाऱ्यांसह संपूर्ण मराठवाड्यात फिरून लोकांकडून मदत, पैसे जमा केले. या कामी विशेष सहकार्य खंडापूरच्या नागरिकांचे राहिले आहे. खंडापूरच्या लोकांनी स्वतःच्या खर्चाने परिसर स्वच्छ करून दिला. कार्यक्रमासाठी भाविकांनी स्वयंस्फूर्तीने सहकार्य केल्याचे सर्वांनी पाहिलेही आहे.

या अध्यात्मिक सोहळ्यासाठी वेगवेगळ्या भागातून भाकरी, चपात्या, पुरणपोळ्या, दूध, तूप, भाज्या आदी साहित्य पुरवले गेले. या सोहळ्यासाठी सामान्य नागरिकांसह विविध संस्था, राजकीय पुढाऱ्यांनीही मोठ्या रकमा देणगी स्वरूपात दिल्या आहेत. तसेच दानपेटीच्या माध्यमातूनही अंदाजे ५ कोटी रुपयांची रक्कम जमा झाली आहे. पावती पुस्तकांच्या माध्यमातूनही कोट्यवधी रुपये जमा झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या रकमा ज्या बँक खात्यावर जमा झाल्या, त्या कोणाच्या खात्यात जमा केल्या व कोणाच्या परवानगीने याची चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच भक्ती शक्ती पावन धाम सेवाभावी संस्था या संस्थेचे बँक खाते गोठवून संस्थेची चौकशी व्हावी, संस्थेच्या सर्व संचालकानाची बँक खाती व मालमत्ता शासनाने तात्काळ ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत,अशी मागणीही यावेळी करण्यात आली. जनतेने अत्यंत विश्र्वासाने, आस्थेने दिलेल्या दानाचा अशा प्रकारे अपहार करणाऱ्या तथाकथित किशोर जाधव शिवणीकर याच्यावर व त्याच्या या प्रकरणातील दोषी सहकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करून त्यांची सखोल चौकशी करण्यात यावी,अशी आग्रही मागणीही या ठिय्या आंदोलनादरम्यान करण्यात आली.

या ठिय्या आंदोलनात स्वातंत्र्य सैनिक प्रदीप पाटील खंडापूरकर , पृथ्वीराज सिंह पाटील खंडापूरकर , अमोल नानजकर, एड. राणीताई स्वामी, रामभाऊ पवार, नेताजी जाधव, काशीबाई हांडे, रामेश्र्वर डोणे ,नागेश जाधव, जयश्री भुत्तेकर, सुरेखा गाडेकर, महेश चामे, तुषार रेड्डी, मोक्षदा भंडारकवटे, अमोल भालेराव, महेश पाटील, वैभव घोबाळे, पृथ्वीराज पवार आदिंसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शासन योजना सामान्यांपर्यंत पोहोचवा : खा. महाडिक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : केंद्र व राज्य सरकारने सामान्यांच्या हिताचे शेकडो निर्णय घेतले आहेत. त्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी भाजपच्या पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन कोल्हापूरचे खासदार धनंजय महाडिक यांनी केले.



भाजपच्यावतीने तालुक्यातील हरंगुळ येथील जनकल्याण निवासी विद्यालयात आयोजित दोन दिवसीय पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानचा शुभारंभ झाला. यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, आ. संजय केणेकर, भाजपाच्या प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, माजी खा. सुधाकर श्रृंगारे, ॲड. शैलेश लाहोटी, जिल्हा सरचिटणीस संजय गीर, नगरसेविका रागिणी यादव, प्रवीण कस्तुरे, निखिल गायकवाड, तुकाराम गोरे उपस्थित होते.

खा. महाडिक म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने गरीब, शेतकरी, महिला, युवक आणि सर्वसामान्यांसाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. परंतु, त्याची जनजागृती झाली नाही, ते काम पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी करावे, असे आवाहन त्यांनी केल डॉ. भागत कराड यांनी जनसंघापासून आजच्या भाजपचा प्रवास सांगितला.

सोशल मीडियावर 'एआय'चा वापर करा अजित कव्हेकर पक्ष वाढीसाठी व पक्षाच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना सामान्यांपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी सोशल मीडिया हे प्रभावी माध्यम आहे. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून 'एआय'चे तंत्रज्ञान आत्मसात करावे. सोशल मीडियाच्या कामाला गती द्यावी, असे आवाहन अजित पाटील कव्हेकर यांनी केले.

## पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : विद्यार्थ्यांना शाळेची ओढ लागावी व शाळेविषयी आस्था निर्माण व्हावी म्हणून शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे शाळेत प्रभावी स्वागत व प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये इयत्ता पहिली ते बारावीतील सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सवाच्या प्रसंगी जोरदार स्वागत करण्यात येणार आहे. यासंदर्भात, शासनाने शाळा प्रवेशोत्सव आयोजनाबाबत परिपत्रक जारी केले आहे. शाळा प्रवेशोत्सवाची माहिती स्कूल पोर्टलवर नोंदविण्यासही सांगण्यात आले आहे. शाळा परिसरातील वयोगट सहा ते १४ वर्षांच्या सर्व मुलांचे प्रवेश झाले का? याची खात्री करण्यास शिक्षकांना सूचित केले असून, शाळाबाह्य झालेली किंवा असलेल्या बालकांचा शोध शाळापूर्व तयारीच्या कालावधीत घेण्यात येणार आहे. शोधून काढलेल्या मुलांना शाळेत प्रवेश देण्याची तयारी शिक्षकांना करावी लागणार आहे. नजीकच्या परिसरातील दगडखानी, वीटभट्टी, बांधकामाचे ठिकाण, उद्याने, बाजारपेठा, पदपथ, सिग्नल, कुटीर उद्योग, कामगार वस्त्या यासारख्या ठिकाणांचे सर्वेक्षण करून तेथे मुले आढळल्यास त्यांना शाळेत आणण्याचे कष्ट शिक्षकांना घ्यावे लागणार आहेत.

## 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सृजनशिलतेला कालानुरुप वाव देणारी सर्वसमावेशक 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी सुक्ष्म व लघु उपक्रमांना विशेष चालना दिली जात आहे.

या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत जिल्हा उद्योग केंद्राकडून बँकेच्या कर्ज मंजुरीनंतर अर्जदाराच्या जात प्रवर्ग आणि उद्योग क्षेत्रानुसार १५ ते ३५ टक्के अनुदान दिले जाते, ज्यामध्ये सेवा उद्योग, उत्पादन उद्योग तसेच कृषी पूरक व्यवसाय, कृषीवर आधारित उद्योग, एकाच नाममुद्रेवर (ब्रँड) आधारित संघटित साखळी विक्री केंद्र, फिरते विक्री केंद्र, खाद्यान्न केंद्र, कुक्कुट पालन, अंडी उबवणी केंद्र, मधुमक्षिका पालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, शाकाहारी व मांसाहारी पदार्थ विक्रीचे हॉटेल किंवा ढाबा व्यवसाय, होम स्टे, क्लाऊड किचन, जलक्रिडा, मासेमारी आणि प्रवासी वाहतुकीकरिता बोट व्यवसाय यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे.

या योजनेमधून फिरते फळे व भाजीपाला विक्री करणारे तसेच फिरते हॉटेल व्यवसाय करणारे वाहनासाठी सुद्धा लाभ घेता येत असल्याने, लातूर जिल्ह्यातील इच्छुकांनी तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या इलेक्ट्रिक वाहनांच्या शोरूमला भेट देऊन अशा वाहनांची चौकशी करावी आणि या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी लातूर जिल्ह्यातील स्थानिक रहिवासी असलेल्या व किमान १८ वर्षे वय पूर्ण केलेल्या स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या उमेदवारांना पात्र मानले जाईल; ज्यामध्ये सेवा उद्योगासाठी ५ लाख रुपयांवरील प्रकल्पासाठी आणि उत्पादन उद्योगासाठी १० लाख रुपयांवरील प्रकल्पासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता आठवी पास असणे आवश्यक आहे.

तसेच अर्जदाराने यापूर्वी कोणत्याही शासकीय अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा आणि या योजनेंतर्गत प्रक्रिया व निर्मिती प्रकल्पासाठी १ कोटी रुपये (जास्तीत जास्त ५० लाख रुपयांच्या अनुदान मर्यादेत) तर सेवा उद्योग प्रकल्पासाठी ५० लाख रुपये (जास्तीत जास्त २० लाख रुपयांच्या अनुदान मर्यादेत) अशी मर्यादा निश्र्चित करण्यात आली आहे.

## काँग्रेसकडून जिल्हा उद्योग केंद्राच्या पत्राची होळी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : शहराच्या उद्योग भवनमध्ये ट्यूशन क्लासेस चालतात, त्या क्लासेसला उठविण्याचा प्रयत्न करू नये, जिल्हा उद्यो केंद्राच्यावतीने काढण्यात आलेले पत्र चुकीचे आहे, असा आरोप करीत काँग्रेसच्यावतीने सोमवारी (दि.२५) येथील उद्योग भवनसमोर त्या पत्राची होळी केली. लातूर पॅटर्नला बदनाम करण्यात येत असल्याचा निषेध करण्यात आला.



जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांनी प्लॉटमालकांना नोटीस काढून ज्या उद्देशासाठी जागा घेतली होती, त्याऐवजी पूरक व्यवसाय सुरू असल्याची आठवण करून दिली होती. तेथे सध्या शिकवणी वर्ग, वसतिगृह, खानावळ आणि अभ्यासिका बंद

करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या फर्मानामुळे ट्यूशन एरियात शिकणाऱ्या हजारो विद्यार्थी आणि पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके म्हणाले, गुणवत्तेचा लातूर पॅटर्न बावनकशी सोने आहे. हा पॅटर्न जनमानसात रुजलेला आहे. आमचे टॅलेंट सिद्ध झालेले आहे, ते कोणालाही बदनाम करता येणार नाही, या नीट पेपर फुटी प्रकरणाच्या आड लातूर पॅटर्नला बदनाम करण्याचे षडयंत्र सुरू आहे, हे खपवून घेतले जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. शिवाजी जवळगेकर, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, किरण जाधव उपस्थित होते.

## इंधनाअभावी शेतकऱ्यांची कामे थांबू नयेत
## आ. अमित देशमुख यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

तभा वृत्तसेवा



लातूर दि. २६ मे : सध्या सर्वत्र सुरू असलेल्या इंधन टंचाईच्या पार्श्र्वभूमीवर, खरीप हंगामाच्या पूर्वतयारीची व बागायती शेतीच्या मशागतीची कामे इंधनाअभावी थांबू नयेत, यासा ठी शेतकऱ्यांना सुलभतेने पेट्रोल व डिझेलचा पुरवठा करण्यात यावा; तसेच गरज पडल्यास शेतकऱ्यांसाठी इंधन पुरवठ्याची स्वतंत्र व्यवस्था निर्माण करावी, अशी आग्रही मागणी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आ. अमित देशमुख यांनी केली आहे.

या संदर्भात त्यांनी सोमवारी, दि. २५ मे रोजी जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांना पत्र पाठवून तातडीने पावले उचलण्याची विनंती केली आहे. शेतकरी बांधवाकडून खरीप हंगामाच्या तयारीची तसेच ऊस व बागायती शेतीच्या मशागतीची सध्या कामे सुरु आहेत. शेती मशागतीच्या या कामासाठी ट्रॅक्टर तसेच इतर वाहनांचा व तांत्रीक अवजारांचा वापर करण्यात येतो आहे. यासाठी पेट्रोल डिझेलची या इंधनाची नितांत आवश्यकता भासते आहे. या अनुषंगान, आ. अमित देशमुख यांनी जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांना पत्र पाठवले आहे.

या पत्रात नमूद केले आहे की, आमदार अमित देशमुख यांनी इंधन टंचाईची सर्वत्र चर्चा सुरु असताना अनेक पेट्रोल पंपावर गाड्यांच्या रांगा लागल्याचे दिसून येत आहे. याठिकाणी शेती मशागतीच्या यंत्रासा ठी लागणारे पेट्रोल /डिझेल घेऊन जाण्यासाठी शेतकरी कॅन बॅरल घेऊन येत आहेत. या शेतकऱ्यांना काही पेट्रोल पंपावर इंधन नाकारले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. इंधन पुरवठ्यात अडचणी येत असल्यामुळे अनेक ठिकाणी पेट्रोल/डिझेलची टंचाई भासत आहे ही वस्तुस्थिती आहे. हे जरी खरे असले तरी सद्यस्थितीत शेतीची कामेही होणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनाही शेती कामासाठी इंधन उपलब्ध होणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांची समस्या, अडचण आणि त्यांची गरज लक्षात घेऊन, त्यांना सुलभ पद्धतीने आवश्यकतेनुसार पेट्रोल/डिझेल उपलब्ध करुन देण्यासंदर्भात जिल्ह्यातील सर्व पेट्रोल-डिझेल पंप धारकांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात. शेती कामासाठी इंधन उपलब्ध करुन देण्यासंदर्भात वेगळी व्यवस्था निर्माण करता येते का हेही पहावे. एकाही शेतकऱ्याची शेती कामे इंधनाअभावी रखडली जाऊ नयेत याची दक्षता घ्यावी, अशी विनंती या पत्राद्वारे आ. अमित देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

## लोकशाही दिन स्थगित

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : लातूर जिल्ह्यात दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्र विधान परिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू आहे. या आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे आगामी सोमवार, १ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती लातूरचे प्रभारी उपजिल्हाधिकारी (सामान्य) गणेश पवार यांनी दिली आहे.

## गुणवत्तेचा लातूर पॅटर्न बावन्नकशी सोनेच राहणार
## आ. अमित देशमुख यांची फेसबुक पोस्ट

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २६ मे : नुकत्याच झालेल्या नीट परीक्षेचा पेपर फुटला, त्याचे धागेदोरे लातूरपर्यंत आले आहेत. यातील संशयितांची सीबीआय चौकशी करीत आहे. ते दोषी आढळले तर न्यायालयाने त्यांना कठोर शिक्षा द्यावी. परंतु, त्यांच्या आडून गुणवत्तेच्या लातूर पॅटर्नला बदनाम करण्याचे सुरू असलेले षढयंत्र थांबणे गरजेचे आहे. लातूरची गुणवत्ता ही बावनकशी सोनेच आहे, हे पुन्हा एकदा सिध्द होईल. सोशल मीडियात सत्ताधारी मंडळींकडून शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. अशा संवेदनशील प्रकरणात राजकारण करणाऱ्या सत्ताधाऱ्यांची कीव येते, अशी फेसबुक पोस्ट माजीमंत्री आ. अमित देशमुख यांनी व्हायरल केली. सोमवारी (दि.२५) दिवसभर त्या पोस्टवर वेगवेगळ्या अंगाने चर्चा सुरू होती.

आपल्या फेसबुक पोस्टमध्ये आ. देशमुख यांनी म्हटले आहे, मागील चार दशकांपासून लातूरच्या गुणवंतांनी पॅटर्न निर्माण केला आहे. या गुणवत्तेवर यापूर्वीही अनेकदा संशय व्यक्त करण्यात आला होता. परंतु, पुन्हा लातूरकरांनी गुणवत्ता सिध्द करून हा पॅटर्न अबाधित ठेवला आहे. नुकत्याच झालेल्या नीट परीक्षेत पेपरफुटीचे धागेदोरे लातूरपर्यंत आले आहेत. त्यात एका प्राध्यापकासह एका शिकवणी चालकावर गुन्हा दाखल आहे. हे प्रकरण आता न्यायालयात गेले आहे. परंतु, जुने व्हिडीओ काढून माझा आणि आरोपीचा सबंध असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न काही पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून होत आहे.

अशा संवेदनशील प्रकरणात राजकारण करणाऱ्या त्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची कीव आल्याशिवाय राहत नाही. नीट प्रकरणात दोषी आढळणाऱ्या सर्व आरोपींना न्यायालय कठोर शिक्षा देणारच आहे. परंतु, विरोधकांकडून होणारे राजकारण योग्य नाही, असे आ. देशमुख यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जामगाव येथे 'शिवतेज ऑईल मिल'चा शुभारंभ

**मुदखेड** -उमरी तालुक्यातील उमरी- मुदखेड मार्गावरील मौजे जामगाव येथे दि. २४ मे रोजी 'शिवतेज ऑईल मिल' या नवीन उद्योगाचा भव्य शुभारंभ सोहळा उत्साहात संपन्न झाला.परीसरातील भागात हक्काचा आणि शुद्ध तेलाचा पर्याय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या पहिल्या आणि नवीन व्यवसायाची सुरुवात करण्यात आली आहे. शिवतेज ऑईल मिलचे मालक स्वप्नील रामेश्वर वाघमारे व अनिरुद्ध वाघमारे आणि वाघमारे परिवाराच्या वतीने सरस्वतीबाई शंकरराव वाघमारे, सौ. ज्योती रामेश्वर वाघमारे व महाराष्ट्र राज्य नगर परिषद, नगर पंचायत व संवर्ग कर्मचारी संघटना मुंबईचे संघटना प्रमुख रामेश्वर शंकरराव वाघमारे यांच्या हस्ते रीबीन कापून व पूजा करून या मिलचे उद्घाटन करण्यात आले. या ऑईल मिलमध्ये आधुनिक यंत्रसामग्रीच्या साहाय्याने तेल बियाण्यांपासून शुद्ध तेल निर्मिती केली जाणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार असून, परिसरातील हा एक महत्त्वाचा उद्योग ठरेल, असा विश्वास संचालकांनी व्यक्त केला. या सोहळ्याला जामगाव, उमरी, मुदखेड आणि परिसरातील अनेक राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नूतन व्यवसायाला आणि वाघमारे परिवाराला शुभेच्छा दिल्या.



## भाजप महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष सागरताई शिंदे-पाटील यांचा सत्कार

**किनवट** - भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष सौ. सागरताई शिंदे-पाटील या नुकत्याच उत्तर भारतातील पवित्र चारधाम यात्रेला जाऊन सुखरूप परतल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. भाजपाच्या आयोजित बी.एल.ए. बैठकीदरम्यान हा सत्कार सोहळा उत्साहपूर्णवातावरणात पार पडला. या प्रसंगी आमदार भिमराव केराम, भाजपाचे जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, सौ. संध्या राठोड तसेच माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेम्मानिवार यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सागरताई शिंदे-पाटील यांचा गौरव करण्यात आला. चारधाम यात्रा ही हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि आध्यात्मिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण मानली जाते. यात्रेदरम्यान देशातील विविध तीर्थक्षेत्रांना भेट देऊन समाजाच्या कल्याणासाठी तसेच देशाच्या प्रगतीसाठी प्रार्थना केल्याचे सागरताई शिंदे-पाटील यांनी यावेळी सांगितले. धार्मिक यात्रेमुळे मानसिक समाधान व सकारात्मक ऊर्जा मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. बैठकीत उपस्थित मान्यवरांनी सागरताई शिंदे-पाटील यांच्या सामाजिक, राजकीय व संघटनात्मक कार्याचे कौतुक केले. पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी महिला कार्यकर्त्यांनी अधिक सक्रिय होण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाला भाजपा व परिवारातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडीच्या सदस्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले.



## प्रदीप हनवते, सम्राट आढाव, आकाश सोनकांबळे यांना समाजभूषण पुरस्कार

**नवीन नांदेड**- अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या वतीने दिल्या जाणारा यावर्षीचा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार २०२६ सिडकोच्या सामाजिक कार्यकर्ते प्रदीप हनवते, सम्राट आढाव, आकाश सोनकांबळे यांना जाहीर झाला आहे. फुले- शाहू -आंबेडकर चळवळीतील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैचारिक, कलात्मक अशा विविध पैलूंनी निः स्वार्थीपणे कार्य असलेल्या सप्त गुणांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सने यंदाचा २०२६ चा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कारासाठी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप हनवते, सम्राट आढाव, आकाश सोनकांबळे यांची निवड झाल्याचे पत्र संबंधित संस्थेच्या निवड समितीचे पत्र निवड समितीचे प्रमुख ड.सुजाता पोहरे नांदेड, डी. एस. वाघमारे अहमदपूर, बा.रा. वाघमारे नांदेड यांच्या स्वाक्षरीने देण्यात आले आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानचित्र व सन्मानपत्र असे असून या पुरस्काराचे वितरण शुक्रवार दिनांक २६ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता नवीन नांदेड सिडको येथे संपन्न होणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नातेवाईक, मित्र मंडळी विलास गजभारे, पत्रकार संभाजी सोनकांबळे, चंपतराव कांबळे, संजय निळेकर यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.



## शेतकऱ्यांच्या खात्यात पीकविम्याची रक्कम तात्काळ जमा करा : कलंबरकर

**मुक्रमाबाद** -खरीप २०२५ च्या मंजूर पीकविम्याची रक्कम अजून खात्यात न पडलेल्या शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता आणि प्रचंड चीड आहे.येण पेरणीमध्ये शेतकऱ्यांना मंजूर पीकविम्याच्या रक्कमेसाठी रस्त्यावर यायची वेळ पडू नये. राहिलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ पिकविम्याची रक्कम जमा करा.मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद, अंबुलगा बु, जांब आणि मुखेड महसूल मंडळात व नांदेड जिल्ह्यातील ५२ महसूल मंडळात,अजून खरीप २०२५ च्या मंजूर पिकविम्याची रक्कम खात्यात पडली नाही. खरीप २०२६ ची पेरणी तोंडावर आली आहे. अजून काही दिवस गेले तर पिकविमा कंपनी शेतकऱ्यांना मंजूर पीकविम्याची रक्कम देणार नाही,बुडवून घेईल. म्हणून, शेतकऱ्यांना मंजूर २०२५च्या पिकविमा रक्कमेसाठी येण पेरणीत रस्त्यावर यायची वेळ पडू देऊ नये. पीकविमा कंपनीला तात्काळ राहिलेल्या शेतकऱ्यांची पिकविमा रक्कम खात्यात जमा करायला लावा अशी मागणी दिनांक २५ मे सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा कृषी अधिकारी कार्यालय यांच्याकडे शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी केली आहे. पिकविमा कंपनी पिकविम्या बाबतीत जी माहिती आणि सद्यस्थिती आहे, ती पत्रक काढून माहिती देत नाही. वेळ मारून न्यायची आणि वेळ गेला की मंजूर पिकविम्याची रक्कम बुडवायची ही पिकविमा कंपनीची पद्धत झाली आहे.पिकविमा कंपनीला पिकविम्याची जी स्थिती असेल त्याची पत्रक काढून स्पष्ट माहिती द्यायला लावली पाहिजे. राहिलेल्या महसूल मंडळातील पिकविम्याची रक्कम तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश पिकविमा कंपनीला द्यावेत. ही मंजूर रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा झाली नाही तर शेतकऱ्यांना रस्त्यावर येऊन आंदोलन केल्याशिवाय पर्याय नाही याची नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी असा इशारा निवेदनात कलंबरकर यांनी दिला आहे.

## मुकनायक नॅशनल अवॉर्डने बाबू शिंदे सन्मानित

**नांदेड** -फुले-शाहू-आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते बाबू शिंदे यांना मूकनायक नॅशनल अवॉर्डने यशवंतराव चव्हाण सभागृह, जि.प. नांदेड येथे विविध मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. हेमंत पाटील हे होते.

# शासनाच्या दिरंगाईविरोधात पत्रकारांचा एल्गार

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णकृती पुतळ्यासाठी सुरू असलेल्या उपोषणाला 'मराठी पत्रकार परिषदे'चा जाहीर पाठिंबा!

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २६ मे -**

भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पूर्णकृती पुतळ्याच्या उभारणीसाठी मुदखेड शहरात सुरू असलेल्या आंदोलनाला आता तीव्र धार चढली आहे. गेल्या १२ मे पासून उपोषणाला बसलेले मारुती डुबुकवाड यांच्या साखळी उपोषणाला 'मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघ' आणि 'मराठी पत्रकार परिषद, मुंबई' यांच्या वतीने अधिकृतपणे जाहीर पाठिंबा घोषित करण्यात आला आहे. पत्रकार संघाने थेट मैदानात उतरून या आंदोलनाला बळ दिल्याने स्थानिक प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत.




**जनतेची रास्त मागणी; प्रशासनाची उदासीनता का?**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील प्रत्येक घटकाला सामाजिक न्याय, समता आणि बंधुत्वाचा संदेश दिला. अशा महामानवाचा पूर्णकृती पुतळा मुदखेड शहरात उभारण्यात यावा, ही संपूर्ण जनतेची अत्यंत रास्त आणि न्याय्य मागणी आहे. मात्र, या संवेदनशील विषयावर स्थानिक प्रशासनाकडून घेतली जाणारी संथ भूमिका आणि दिरंगाई नागरिकांच्या संयमाची परीक्षा पाहणारी ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर मारुती डुबुकवाड यांनी गेल्या अनेक दिवसांपासून साखळी उपोषणाचे हत्यार उपसले आहे.

**पत्रकार संघाचे थेट प्रशासनाला आव्हान**

मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाने या आंदोलनाची गंभीर दखल घेत उपोषणकर्त्यांना लेखी पाठिंबा दिला आहे. पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ जळबाजी चौदंते, उपाध्यक्ष नामदेव नारायण बिच्चेवार, आणि सचिव साहेबाराव रामा गागलवाड यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने हे जाहीर समर्थन पत्र देण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची उभारणी हा केवळ एक पुतळा नसून तो सामाजिक अस्मितेचा आणि कृतज्ञतेचा विषय आहे. स्थानिक प्रशासनाने आता अधिक काळ वेळकाढूपणा न करता, सकारात्मक दृष्टिकोन ठेवून तात्काळ योग्य निर्णय घ्यावा आणि पुतळा उभारणीचा मार्ग मोकळा करावा, अन्यथा आंदोलनाची तीव्रता अधिक वाढेल, असा इशारा पत्रकार संघाच्या वतीने देण्यात आला आहे.

**अनेक दिग्गजांच्या स्वाक्षऱ्यांनी वाढले आंदोलनाचे वजन**

या समर्थन पत्रावर शहरात कार्यरत असलेल्या अनेक पत्रकारांच्या आणि जबाबदार पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यामध्ये शेख अजगर हुसेन साब, उत्तम हानमंते,

साहेबाराव हौसरे, दिनेश शर्मा, प्रताप देशमुख, देवानंद गुंजाळ, अतिक अहमद, धम्मदाता कांबळे, शेख जब्बार,रुखमाजी शिंदे, पिराजी गाडेकर,संतोष सावंत, हाफिज खुरेशी, संजय कोलते,यांसह तालुक्यातील आघाडीच्या पत्रकारांचा समावेश आहे.

पत्रकार संघाने थेटपणे या आंदोलनात उडी घेतल्याने आता हे आंदोलन केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित राहिले नसून, त्याला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आता प्रशासन यावर काय पाऊल उचलते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# विकसित महाराष्ट्र २०४७ साठी स्वारातीम विद्यापीठाची मोठी झेप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ मे -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने येथे इतिहास रचला आहे. महाराष्ट्र शासनाने विद्यापीठाला विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत उच्च शिक्षण क्षेत्रासाठी भारतातील पहिली एआय-ब्लॉकचेन आधारित ऑनलाइन केपीआय मॉनिटरिंग सिस्टीम विकसित करण्याचा २९.९० लाखांचा प्रकल्प दिला आहे. ही प्रणाली राज्यातील सर्व ४२ सार्वजनिक विद्यापीठांच्या २८ मुख्य कार्यक्षमता निर्देशकांचा मागोवा एआय, रिअल-टाइम डॅशबोर्ड आणि ब्लॉकचेन-आधारित ऑडिट ट्रेलच्या माध्यमातून घेईल.

विद्यापीठाचे कुलगुरू तथा प्रकल्पाचे मानद समन्वयक डॉ. मनोहर जी. चासकर यांनी प्रकल्प टीमचे अभिनंदन करताना सांगितले की हे यश विद्यापीठातील प्राध्यापकांच्या समर्पणाचे आणि तांत्रिक कौशल्याचे प्रतिबिंब आहे. यामुळे उच्च शिक्षण डिजिटल प्रशासनात एसआरटीएम विद्यापीठ राष्ट्रीय पातळीवर आघाडीवर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, एसआरटीएम विद्यापीठाच्या क्षमतेवर विश्वास ठेवून हा ऐतिहासिक प्रकल्प मंजूर केल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले.

प्रकल्पाचे मुख्य अन्वेषक व आयक्यूएसी संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी सांगितले की, ही नवीन केपीआय मॉनिटरिंग सिस्टीम सर्व ४२ विद्यापीठांमध्ये पारदर्शकता आणि अचूक डेटावर आधारित निर्णयक्षमता आणेल. त्यांनी अधोरेखित केले की त्यांच्या टीमचे इतर मोठे प्रकल्प पीएम-उषा डॅशबोर्ड (राज्य प्रकल्प संचालनालय, रुसा, महाराष्ट्र शासन) आणि



ओयूआयएमएस (उस्मानिया विद्यापीठ, हैदराबाद) अंतिम टप्प्यात आहेत आणि लवकरच प्रक्षेपित होण्यास सज्ज आहेत. या सर्व यशांमुळे 'स्वारातीम' विद्यापीठाने उच्च शिक्षण डिजिटल प्रशासनात राष्ट्रीय नकाशावर आपले स्थान निर्माण केले आहे.

हे २८ केपीआय राष्ट्रीय मानकांशी सुसंगत बनवण्यात आले आहेत. सह-अन्वेषिका व शालेय गणित विज्ञान संचालक डॉ. रुपाली एस. जैन यांनी स्पष्ट केले की, या निकषांमध्ये एनआयआरएफ, नॅक आणि युजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे विद्यापीठांना राष्ट्रीय रँकिंगशी सुसंगत राहून आपल्या प्रगतीचे योग्य मूल्यांकन करता येईल. सह-अन्वेषक व नवोन्मेष, उद्योग जोडणी व लिंकेजेस संचालक डॉ. एस. जे. वाधेर यांनी नमूद केले की, विविध विद्यापीठांच्या आयक्यूएसी संचालकांच्या सूचनांचा यात समावेश करण्यात आला असून, यामुळे संस्थांना आपल्यातील उणिवा शोधून एकूण कार्यक्षमता सुधारता येईल.

प्रणालीचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे. प्राथमिक आवृत्ती (Version १.०) तीन महिन्यांत आणि एआय-आधारित अंतिम प्रणाली सहा महिन्यांत सादर केली जाईल. शासनाचा निधी केवळ सॉफ्टवेअर विकासासाठी आहे; सर्व हार्डवेअर व पायाभूत खर्च एसआरटीएम विद्यापीठ स्वतः उचलेल.

प्र-कुलगुरू डॉ. आशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा प्रमुख प्रा. एम. के. पाटील तसेच इतर सर्व विधि अधिकारी, संचालक आणि प्राध्यापकांनी प्रकल्प टीमचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे आणि पूर्ण प्रशासकीय मदतीचे आश्वासन दिले आहे. अनेक प्राध्यापकांनीही शुभेच्छा देत या प्रकल्पामुळे विद्यापीठाची प्रतिष्ठा वाढेल आणि राज्याच्या विकासात योगदान मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## महाराजस्व अभियान राज्यस्तरीय समितीवर आ. हेमंत पाटील

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ मे -**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान या राज्य शासनाच्या राज्यस्तरीय समितीवर मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील यांची सदस्य निवड करण्यात आली आहे.



या अभियानाच्या अनुषंगाने आमदार हेमंत पाटील यांच्याकडे नांदेड ,हिंगोली आणि यवतमाळ जिल्ह्याचे प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आल्याने खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळेल यात दुमत नाही.आमदार हेमंत पाटील हे लोकसभा सदस्य असल्यापासून शेतकरी हितासाठी आणि त्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्य करून त्यांना न्याय मिळवून दिला आहे.तसेच वसमत येथे सुरू असलेल्या हळद संशोधन केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी कार्य करत आहेत. या अभियानाच्या माध्यमातून सक्रिय सहभाग घेऊन ज्या ठिकाणी शिबीर सुरू आहेत त्याठिकाणचा दौरा करून अभियान यशस्वीरीत्या पार पाडावे यासाठी सातत्याने प्रयत्न करावे.शासन व जनता यातील दुवा म्हणून सदैव कार्य करण्यात यावे.आमदार हेमंत पाटील यांची या समितीवर निवड झाल्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# गाजावाजा अन् फ्लेक्सपेक्षा 'फॅन'ची भेट ठरली चर्चेचा विषय !

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २६ मे -**

आजच्या काळात वाढदिवस म्हटले की मोठमोठे बॅनर, फटाक्यांची आतषबाजी आणि अनावश्यक खर्च दिसून येतो. मात्र देगलूर तालुक्यातील शेतकरी चळवळीतील सक्रिय नेतृत्व म्हणून परिचित असलेले कैलास येसगे कावळगावकर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त एक वेगळाच आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

करडखेड येथील पूर्वरिश्वर महादेव मंदिरात येणाऱ्या भाविकांना उन्हाळ्यात दिलासा मिळावा या उद्देशाने त्यांनी मंदिरास पाच सिलिंग फॅन भेट देत वाढदिवस सामाजिक बांधिलकीने साजरा केला. त्यांच्या या उपक्रमामुळे मंदिर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

वाढदिवस हा केवळ शुभेच्छांचा दिवस नसून समाजासाठी काहीतरी देण्याची संधी असते, हा संदेश कैलास येसगे यांच्या कृतीतून दिसून आला. सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविणारे आणि शेतकऱ्यांच्या अडचणींसाठी नेहमी पुढे असणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे.

विशेष म्हणजे, वाढदिवसानिमित्त होणाऱ्या अनावश्यक खर्चाला फाटा देत समाजोपयोगी वस्तू भेट देण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय अनेक युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. मंदिरात येणाऱ्या भाविकांना आता उकाड्यात दिलासा



मिळणार असल्याने ग्रामस्थांनी त्यांचे आभार व्यक्त केले. पूर्वरिश्वर महादेव मंदिर समिती व गावकऱ्यांनी कैलास येसगे यांचे स्वागत सत्कार करून कैलास येसगे यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यापूर्वीही कैलास येसगे यांनी मंदिर परिसरात भाविकांना बसण्यासाठी बेंचेसही भेट दिली.

साधेपणा, समाजसेवा आणि लोकांप्रती असलेली जिव्हाळ्याची भावना यामुळे कैलास येसगे यांचा वाढदिवस परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे. या कार्यक्रमाला पूर्वरिश्वर मंदिर समितीचे पंकज देशमुख, गुंडप्पा गाजले गुरूजी, पुजारी श्रीपद महाराज, श्रीनिवास मंदिलवार, नंदकिशोर मोघे, बाबुराव चिनगुलवार, बालाजी ईबितवार, दिगंबर कोकणे, सुदर्शन पुलगमवार, अहमद कुरेशी, अनिल रामदिनवार, भरत पाटील मरखेलकर, दिलीप सुर्यवंशी, निखिल पाटील ठाणेकर, संदिप पाटील देगावकर, दीपक रेड्डी मरतोळीकर, शहाजी पाटील बाबरे, प्रा. संतोष गाजले, बसवंत पटणे, ईश्वर मुंडकर, बस्वराज फुलारी, माधव लगडे, बालाजी शिंदे, रवी ठाकूर, विशाल कडेवार यांच्यासह करडखेड व परिसरातील अनेक मंडळी उपस्थित होते.

# बळीरामपूर नांदेड येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ मे -**

राज्याचे अति. पोलीस महासंचालक डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांच्या शुभहस्ते दि. १ मार्च २०२३ रोजी श्रीसंत गुरु रविदास मंदिर तिर्थक्षेत्र वर्ग ब बळीरामपूर नांदेड येथे गुरु रोहिदास अभ्यासिकेचे उद्घाटन करण्यात आले होते. या अभ्यासिकेच्या सवलतीचा लाभ घेऊन नुकत्याच जाहीर झालेल्या शालांत परीक्षेत गुणानुक्रमाने उत्तीर्ण झालेले परिसरातील विद्यार्थी विपुल गोडबोले, प्रतिक सुर्यवंशी, आशिष पाईकराव, शैलेंद्र सोनकांबळे, ओम कापूरे, प्रणव सोनकांबळे यांचा ग्रामीण/सिडको पोलिस विभागात कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष पोलीस हेडकॉन्स्टेबल पी.सी. कानगुले यांच्या शुभहस्ते वरील सर्व गुणवंतांचा पुष्पहार घालून पेढे देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे नियोजन पवन पवार या तरुण विद्यार्थ्याकडून करण्यात आले होते. कार्यक्रमास साईनाथ चांदणे, माधव जाधव, स्वराज आंबटवार, अनिरुद्ध पवार, युवराज गोडबोले यांच्यासह पालकवर्ग व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तिर्थक्षेत्राचे संस्थापक वामनराव मे. विष्णुपूरीकर यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन भावी शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# नांदेडच्या श्री गुरु गोविंद सिंघ जी स्टेडियमच्या आधुनिकीकरणासाठी ४०० कोटींच्या प्रकल्पास मंजुरी द्या : खा. डॉ. गोपछडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ मे -**

नांदेड येथील श्री गुरु गोविंद सिंघ जी स्टेडियमच्या क्षमता विस्तार व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज आधुनिकीकरणासाठी ४०० कोटींचा निधी मंजूर करावा अशी मागणी खा. डॉ अजित गोपछडे यांनी केंद्रीय युवा कार्य व क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांची भेट घेऊन केली आहे.

क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांना दिलेल्या निवेदनात खा. डॉ. अजित गोपछडे यांनी , नांदेड ही श्री गुरु गोविंद सिंघजींच्या पावन स्मृतींनी समृद्ध नगरी असून येथे क्रीडा क्षेत्राला चालना देण्यासाठी आधुनिक स्टेडियमची आवश्यकता आहे. यापूर्वी केंद्र सरकारच्या संस्कृतीक मंत्रालयाने ४० कोटी रु. च्या



प्रस्तावास मान्यता दिली होती ते काम आता पूर्ण झाले असून नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेमार्फत स्टेडियमच्या आधुनिकीकरण व पुनर्बांधणीचा सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन मिळण्यासोबतच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करण्यासही मदत होणार आहे. सुधारित प्रकल्प अहवालानुसार सुमारे ४०० कोटी रुपयांचा वाढीव खर्च अपेक्षित असून, यात मुख्य स्टेडियम इमारत, प्रेक्षक गॅलरी, क्रीडा सुविधा, आधुनिक प्रकाश व्यवस्था, सुरक्षा सुविधा, प्रशासकीय विभाग, पार्किंग तसेच इतर अत्याधुनिक सुविधा उभारण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. हा निधी मंजूर झाल्यास स्टेडियमचे काम अत्याधुनिक पद्धतीने पूर्ण केले जाईल ज्यामुळे नांदेड जिल्ह्यात क्रीडा क्षेत्राला मोठी भरभराटी येईल . शिवाय महाराष्ट्रासह देशातील महत्त्वाचे खेळही या ठिकाणी खेळविले जातील. ज्यातून नांदेडचा आर्थिक विकास साधता येईल .असा विश्वास खा. डॉ. अजित गोपछडे यांनी व्यक्त केला.

# गोवंश हत्या बंदी कायद्याच्या कडक अंमलबजावणीची मागणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २६ मे -**

राज्यातील गोवंश हत्या बंदी कायद्याची कठोर अंमलबजावणी करून अवैध गोवंश वाहतूक व कत्तल करणाऱ्यांवर कडक गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भातील निवेदन पोलीस निरीक्षक गणेश कराड यांना देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने नुकतेच गोवंश संरक्षण कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात विशेष शासन परिपत्रक जारी केले असून, त्यानुसार पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. काही ठिकाणी अजूनही छुप्या मार्गाने गोवंशाची



अवैध वाहतूक व कत्तल सुरू असल्याचा आरोपही करण्यात आला.

या प्रकारामुळे धार्मिक भावना दुखावल्या जात असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. त्यामुळे संबंधितांवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी विश्व हिंदू परिषद जिल्हा मंत्री संतोष रायेवार, कोषाध्यक्ष शिवराज चाडावार, शहर मंत्री जयंत मच्छर्लावार, व्यंकट भातनासे, भाजपा शहर मंडल अध्यक्ष स्वागत आयनेनिवार, उमाकांत कऱ्हाळे, बाळकृष्ण कदम, जय वर्मा, सतिष बिराजदार, कृष्णा कलकुंटलावार, विश्वास कोल्हारीकर, सुनिल मच्छेवार, राजेंद्र भातनासे, रोहित चाडावार, अविनाश सल्लेवार, संतोष मारपवार यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सकल मातंग समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## अनुसूचीत जातींचे उपवर्गीकरणाची तत्काळ घोषणा करण्याची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून वंचीत घटकांना न्याय देण्यासाठी महाराष्ट्र राज्यात तत्काळ अनुसूचीत जातींचे उपवर्गीकरण अ, ब, क, ड लागू करण्यात यावे या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी मंगळवार दि २६ मे रोजी सकल मातंग समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन सादर केले. दि १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाद्वारे राज्यांना अनुसूचीत जातींचे उपवर्गीकरण करण्याचा घटनात्मक अधिकार प्रदान करण्यात आला आहे. या निर्णयामध्ये वास्तविक समानता, अंतर्गत मागासलेपणा, अपुरे प्रतिनीधीत्व या निकषांना विशेष महत्व देण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यातील अनुसूचीत जाती सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या एकसंघ नसून त्या विविध स्तरांमध्ये विभागलेल्या आहेत. प्रत्यक्षात काही मोठ्या जातींनी आरक्षणाचा मोठा लाभ घेतला असून मातंग व तत्सम जाती आजही सर्व क्षेत्रात मागे राहीलेल्या आहेत. त्यामुळे उपवर्गीकरण करणे ही काळाची गरज आहे.

महाराष्ट्र शासनाकडून उपवर्गीकरण करतांना लोकसंख्या किंवा जातवार महामंडळाचा आधार घेतला जात आहे वास्तविक असा आधार सर्वोच्च न्यायालयाच्या निकषांशी विसंगत असून तो घटनात्मक तत्वांना धरून नाही. उपवर्गीकरणाचा उद्देश आरक्षणाचा लाभ खऱ्या अर्थाने वंचीत घटकांपर्यंत पोहोचवणे हा आहे. त्यामुळे अनुसूचीत जातीचे दोन गटात वंचीत अनुसूचीत जाती आणि इतर अनुसूचीत जाती उपवर्गीकरण करण्यात यावे. अनुसूचीत जातीसाठी १३ टक्के आरक्षणापैकी ६ टक्के आरक्षण वंचीत अनुसूचीत जातीसाठी ठेवावे, उर्वरित ७ टक्के आरक्षण इतर अनुसूचीत जातींसाठी ठेवावे. १९६० पासून वंचीत अनुसूचीत जातींच्या सेवा भरतीतील अनुशेष तातडीने व प्राधान्याने भरावा, साहीत्यरत्न डॉ अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा, क्रांतीवीर लहुजी साळवे अभ्यास आयोगातील शिफारशीची तत्काळ अंमलबजावणी करावी, मातंग समाजातील नेत्यांना पोलिस संरक्षण देण्यात यावे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महामंडळास भरघोस निधी उपलब्ध करून द्यावा आदी मागण्यांचे निवेदन यावेळी देण्यात आले. या मोर्चात डॉ अमोल धुमाळ, भागवत डोंगरे, सुमित कांबळे, व्यंकटेश सोनटक्के, संतोष साठे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला, पुरूष सहभागी झाले होते.

# दुचाकी चोरास पकडून तीन दुचाकी जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

हिंगाली जिल्हयातील मोटारसायकल चोरीला आळा घालुन चोरटयाचा शोध घेवुन गुन्हे उघड करून चोरीच्या मोटार सायकल हस्तगत करण्याबाबत पोलिस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने मोटार सायकल चोरी विरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

दिंनाक २५/०५/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की, आरोपी नामे सतिष लक्ष्मण पोटे वय १९ वर्षे रा. जलाल धाबा ता. औंढा ना. याने हिंगोली शहरातील काही मोटारसायकल चोरून विक्री करण्याचा प्रयत्न करत आहे. अशा माहिती वरून सदर मोटारसायकल चोरास कयाधु नदीचे पुलाजवळ नाकाबंदी लावुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने हिंगोली शहरातुन वेगवेगळ्या ठिकांनावरून ०३ मोटारसायकल चोरून वेगवेगळया ठिकाणी लावल्याचे सांगीतले त्यावरून त्याचेकडुन चोरीच्या ०३ मोस क. एमएच ३८– टी ६०६५ हिरो कंपनीची क्र एमएच ३८– एस ७००९ हिरो कंपनीची, विना क्रमांक हिरो स्पेंल्डर असे एकुण कि.अं. २,५०,००० जप्त करून पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथील ०२ गुन्हे उघड करून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक डॉ. नीलाभ रोहन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि मोहन भोसले, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे, पोलीस अंमलदार भुजंग कोकरे, गजानन पोकळे, शिवाजी जालमिरे, साईनाथ कंठे, नरेंद्र साळवे, ज्ञानेश्वर गारे, हरिभाउ गुजंकर यांचे पथकाने केली आहे.

# हिंगोलीच्या १३ वर्षीय निपुण अग्रवालने सर केले एव्हरेस्ट बेस कॅम्प, मराठवाड्यातील सर्वात कमी वयाचा गिर्यारोहक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

जिद्द, मेहनत आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर हिंगोलीच्या निपुण अनुप निकिता अग्रवाल या १३ वर्षीय मुलाने २४ मे २०२६ रोजी एव्हरेस्ट बेस कॅम्प (एइउ) यशस्वीरित्या सर केला आहे. ५,३६४ मीटर/१७,५९८ फूट उंचीवर, जिथे हवेत केवळ ५०% ऑक्सिजन असतो, अशा जगातील सर्वात खडतर ट्रेक्सपैकी एक असलेल्या मोहिमेत निपुणने इतिहास रचला.




या कामगिरीसह निपुणच्या नावे अनेक विक्रम नोंदवले गेले आहेत, मराठवाड्यातून एव्हरेस्ट बेस कॅम्प गाठणारा सर्वात कमी वयाचा गिर्यारोहक म्हणून त्याची नोंद झाली आहे.

गेल्या एक वर्षापासून निपुणने या मोहिमेसाठी अथक परिश्रम घेतले. पहाटे लवकर उठून केलेला सराव, कडक शिस्त आणि जिद्द याच्या जोरावर त्याने हे यश संपादन केले. बेस कॅम्पवर भारताचा तिरंगा छातीवर लावून उभ्या असलेल्या निपुणचा फोटो सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

निपुणचे आजोबा ॲड. आर. एन. अग्रवाल आणि आजी सरोज अग्रवाल यांनी आनंद व्यक्त करताना सांगितले की, आमच्या संपूर्ण कुटुंबासाठी हा अभिमानाचा आणि कृतज्ञतेचा क्षण आहे. निपुणने वयाच्या १३ व्या वर्षीच एक मोठा टप्पा गाठला आहे. त्याने दाखवून दिले की वय हे केवळ एक आकडा आहे आणि दृढनिश्चय असेल तर काहीही अशक्य नाही. निपुणच्या या यशामुळे हिंगोली जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**हिंगोली– जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या पेट्रोल व डिझेल इंधनाबाबत मंगळवारी पत्रकार परिषद घेतली. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी अप्पासाहेब पाटील, माहीती अधिकारी प्रभाकर बारहात्ते यांची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### कृषी निविष्ठा वाहतुक करणाऱ्या वाहनांना इंधन पुरवठा करण्याची मागणी



हिंगोली– हिंगोली जिल्ह्यांमध्ये मागील काही दिवसापासून डिझेलचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे कृषी निविष्ठा जसे खत आणि बियाणे वाहतूक करणाऱ्या वाहनांना त्रास होत आहे. अगोदरच बाजारात खतांचा तुटवडा जाणवत आहे आणि खरीप हंगाम अत्यंत जवळ येऊन ठेपला आहे. त्यामुळे प्रशासनाने या बाबीकडे लक्ष देऊन कृषी निविष्ठा वाहतूक करणाऱ्या वाहनांना इंधनपुरवठा करण्यासाठी व्यवस्था करावी अशा आशयाचे निवेदन जिल्हा कृषी अधिक्षक अतुल वाईसे यांना हिंगोली जिल्हा सीड्स पेस्टिसाइड्स अँड फर्टीलायझर डीलर असोसिएशन तर्फे देण्यात आले. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आनंद निलावार, कोषाध्यक्ष पवन पातुरकर, उपाध्यक्ष राहुल झांजरी उपस्थित होते.

### एनसीसीच्या वार्षिक शिबीरासाठी निवड



हिंगोली– येथील सरजुदेवी भिकुलाल भारुका आर्य कन्या विद्यालयातील छात्र सेनेच्या १० विद्यार्थिंनी नांदेड जिल्ह्यातील शंकर नगर येथे होणार्या शिबीरासाठी रवाना झाल्या आहेत. नांदेड जिल्ह्यातील शंकर नगर येथे २५ मे ते ३ जून या कालावधीत एनसीसीचे वार्षिक शिबीर होणार आहे. या शिबीरामध्ये हिंगोली येथील सरजुदेवी भिकुलाल भारुका विद्यालयाच्या १० विद्यार्थिंनी फस्ट ऑफिसर सोनल जैस्वाल यांच्या नेतृत्वाखाली रवाना झाल्या आहेत. यामध्ये वाघमारे सांची शीलसागर, जगताप माहेश्वरी कैलास,वाघमारे माहेश्वरी माधव, घुगे ज्ञानेश्वरी दत्तराव, पिहू खडसे गौतम, गोगटे अपर्णा सुधीर, वाघमारे प्रांजल अश्विन, बोधनकर शिल्पा राजू, घ्यार प्रयुक्ता विजय, भवन पायल रमेश यांचा समावेश आहे.

### ७९ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७९ वाहनचालकांविरूध्द कारवाई करीत ८७ हजार ८०० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना ऑनलाईन अर्जाला सुरूवात

## महाडीबीटी पोर्टलचे काम पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकटी देत पशुपालन व्यवसायाला उद्योजकतेचे आधुनिक स्वरूप देणारी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' अत्यंत पारदर्शक पद्धतीने राबविण्यासाठी पशुसंवर्धन विभाग कटिबद्ध असून, महाआयटीमार्फत 'महाडीबीटी' पोर्टलवर अर्ज स्वीकृतीसाठी सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण होताच इच्छुक लाभार्थ्यांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येणार असल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे.

राज्यातील पशुसंवर्धन व्यवसायाला नवी दिशा देणे तसेच ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण भागातील उद्योजकतेला चालना देणारी ही योजना राज्याच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणारी ठरणार असून, राज्यातील युवक, शेतकरी आणि पशुपालकांमध्ये या योजनेबाबत मोठा उत्साह दिसून येत आहे.

योजनेची अंमलबजावणी वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने व्हावी, यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे. लाभार्थ्यांना घरबसल्या सहज अर्ज करता यावा यासाठी 'महाडीबीटी' पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी महाआयटीकडे विशेष पोर्टल विकसित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली असून, तांत्रिक टीमकडून हे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

पोर्टलचे काम पूर्ण होताच योजना अधिकृतपणे सुरू झाल्याची सूचना पशुसंवर्धन विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचेही आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी स्पष्ट केले आहे. 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'विषयी अधिकृत माहिती, शंका निरसन किंवा मार्गदर्शनासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी १९६२ या टोल–फ्री कॉल सेंटर क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच, अधिक माहितीसाठी परिसरातील नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# जैवविविधता दिनानिमित्त कयाधू नदी काठावरील शेतकऱ्यांची कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

महाराष्ट्र राज्य जैवविविधता बोर्ड, वनविभाग, हिंगोली व उगम ग्रामीण विकास संस्था उमरा ता. कळमनुरी जि. हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक जैवविविधता दिनानिमित्त कळमनुरी तालुक्यातील कोंढुर, डिग्रस, चाफनाथ, सालेगांव व रुपूर येथील जैवविविधता व्यवस्थापन समिती व कुरण संवर्धक समिती सदस्यांची कार्यशाळा उगम संस्थेमध्ये घेण्यात आली.

जयाजी पाईकराव यांनी जैवविविधता समितीने गावातील गौण संपदेचे संवर्धन करावे तसेच जल, वन, जंगल व तृण संपदा संवर्धन करून त्याआधारित उपजीविका निर्माण करावी असे प्रतिपादन केले. कयाधू नदी काठावर असलेली गवते, वाळू ही मोठी संपदा आहे. त्याचे संवर्धन होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

सागर खोडके यांनी पाणी निर्माण करता येत नाही त्यामुळे पुनर्भरण करून पाणी संवर्धन करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर त्याचा कार्यक्षम वापर करणे व सूक्ष्म सिंचनाचा वापर करावा. त्याच बरोबर शेतीमध्ये पाणी नियोजन महत्वाचे असल्याने पाणी ताळेबंद केल्यास त्याचा उपयोग होऊ शकतो असे त्यांनी सांगितले. गंगाधर भुसेकर यांनी शेतकऱ्यांना पिकाची व जमिनीचे माहिती दिली. शेतीचे उत्पादन कसे वाढवायचे त्यासाठी मूळ स्थानी जलसंधारण ठिबक पदतीने कसे करायचे ते सांगितले त्यानंतर भीमराव भिसे यांनी सेंद्रिय शेती काळाची गरज या विषयावर उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. राम खंदारे यांनी पिकाची जैवविविधता जतन करणे कसे आवश्यक आहे यावर भर दिला.

सहसंशोधक विकास कांबळे यांनी सांगितले की तृणसांपदा नदी काठ टिकून ठेवण्यासाठी उपयोगी ठरते, तसेच पाणी संवर्धनासाठी उपयोगी ठरते. या आधारित शाश्वत उपजीविका निर्माण केली जाऊ शकते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय पडघन यांनी केले तर आभार भीमराव भिसे यांनी केले. कार्यशाळा यशस्वीतेसाठी संचालक दिशांत पाईकराव, दत्ता कवडे, अमोल चेंडके, विठ्ठल पतंगे, ओमकार भालेराव, ज्ञानेश्वर दळवी, चांदोजी लाखाडे, सिद्धार्थ निनुले यांनी सहकार्य केले. कार्यशाळेत ७८ शेतकरी उपस्थित होते.

# उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रमात आदर्श महाविद्यालयाची ऐश्वर्या गिरी सर्वप्रथम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

येथील आदर्श महाविद्यालयातील उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचा मार्च २०२६ मधील परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे.या अभ्यासक्रमात कु. ऐश्वर्या रामभाऊ गिरी ही गुणानुक्रमे सर्वप्रथम आलेली आहे.



आदर्श महाविद्यालयाच्या वतीने गुणवंत कु. ऐश्वर्या गिरी सर्वप्रथम आल्याबद्दल प्राचार्य प्रो.डॉ. विलास आघाव यांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी विभागाचे शिक्षक मेजर पंढरीनाथ घुगे, निबंधक दिलीप दुबे व संगणक शास्त्र विभागाचे प्रा. रवींद्र केने तसेच गुणवंत उपस्थित होते.

उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम अंतर्गत महाविद्यालयात मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी व अकाउंटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट हे व्यवसाय अभ्यासक्रमातील सर्व विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत . यामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमात ऐश्वर्या रामभाऊ गिरी सर्व प्रथम, पूजा मधुकर अवचार सर्व द्वितीय, वैष्णवी रमेश दवणे तृतीय क्रमांक मिळाला आहे.

उच्च माध्यमिक व्यवसायिक अभ्यासक्रमातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. शिक्षक मेजर पंढरीनाथ घुगे, प्रा. पंडित कुऱ्हाडे, प्रा. विजयकुमार जट्टे यांचे महाविद्यालयाच्या वतीने १००% निकालाबद्दल अभिनंदन करण्यात आले.

# संत भीमा भोई महाराज यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ मे**

भोई समाजातर्फे अष्टविनायक नगर येथे राष्ट्रीय संत भीमा भोई महाराज यांची १७६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी आली. यावेळी भोई समाज हिंगोली चे नाईक, राजू भाऊ आडणे, भोई समाज क्रांती दलाचे गणेश रावजी वानखेडे, संतोष रावजी नेमाडे, बजरंग भारस्कर, नारायण चहारे,आकाश संदुसे, रामेश्वर कुकडे, संतोष आडणे, विनोद भारस्कर, शिरपुरे, रुपेश सुरदुसे, नितीन नेमाडे यांच्यासह मोठ्या संख्येने समाज बांधव, भगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वितेसाठी आकाश आडणे, अमोल आडणे, अक्षय भारस्कर, प्रसाद चहारे, कार्तिक आडणे रोहन आडणे, चैतन्य कुकडे आदींनी परिश्रम घेतले